UNIVERSAL LIBRARY
OU_196045
UNIVERSAL LIBRARY

UP—391—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M170 B21A

Accession No. M1467

Author आंबेकर, ब. र.

Title आमची शाळा.

This book should be returned on or before the date last marked below.

# अमृतवाणी

लेखक

दत्तू बांदेकर

किंमत तीन रुपये

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनिवार, पुणे २.

१ सर्व हक्क सुरक्षित
२ चित्र – दीनानाथ दलाल

मुद्रक
र. अ. मोरमकर,
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
ठाकुरद्वार, मुंबई २

१९४८

★

# अ मृ त वा णी

★

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | माणूस आणि तक्रार ! ... ... | ९ |
| २ | मृत्युलेख ... ... | १४ |
| ३ | कावळा ... ... | १८ |
| ४ | संगतीचा परिणाम ! ... ... | २२ |
| ५ | वाढत्या वयाची जाणीव ! ... | २६ |
| ६ | जगण्याचा टॅक्स ... ... | ३० |
| ७ | जरा हळू ... ... | ३५ |
| ८ | गरजवंताला अक्कल असते ... | ४० |
| ९ | हुंड्याची चाल ... ... | ४६ |
| १० | आरसा ... ... | ५० |
| ११ | घरांत आणि घराबाहेर ! ... | ५४ |
| १२ | स्पष्टवक्तेपणा ! ... ... | ५८ |
| १३ | शिष्टाचार ... ... | ६४ |
| १४ | उपदेश ... ... | ६८ |
| १५ | चित्रपटांचे फायदे ... ... | ७२ |
| १६ | जाहिरातींचे उपकार ... ... | ७६ |
| १७ | नळ आणि समुद्र ... ... | ८० |
| १८ | मानवाचा शत्रु कोण ? ... | ८३ |
| १९ | क्षणाचे मित्र ... ... | ८८ |
| २० | गर्दी ... ... | ९२ |

श्री. बांदेकर यांचीं

आगामी पुस्तकें

१ हिरवी माडी
२ गडी फू
३ आंवळ्याची मोट
४ कबुलीजबाब

## श्री. दत्तू बांदेकर
## यांचीं पुस्तकें

तो आणि ती
अतिप्रसंग
आडपडदा
चोरपावलें
प्रेमपत्रें
बहुरूपी
पेंचप्रसंग
**अमृतवाणी**
**नवी आघाडी**
**तूं आणि मी**
**सख्या हरि**
**नजरबंदी**

## आगामी पुस्तकें

१ सांजवात

—खांडेकर

२ घरचा मालक

—शकुंतला परांजपे

# माणूस आणि तक्रार ! १

माणसाचें जीवन अनेक प्रकारच्या तक्रारींनीं भरलेलें असतें. रोज उठून कांहीं ना कांहीं तक्रार केल्याशिवाय, माणसाला चैनच पडत नाहीं. तक्रार करणें, हा माणसाचा प्रकृतिधर्मच आहे.

माणसाला न आवडण्यासारखी एखादी गोष्ट घडली कीं तो तक्रार करीत असतो. आणि या जगांत शेंकडों गोष्टी तर आपल्या मनाविरुद्ध घडत असतात ! मग तक्रार केल्याशिवाय कुणाला कसें राहतां येईल ?

माणसाच्या आयुष्यांत महत्त्वाच्या तक्रारी असतात, त्याप्रमाणें क्षुद्र आणि किरकोळ तक्रारीही विपुल असतात. सरकारच्या गैरकारभाराबद्दल, म्युनिसि-

पालिटीच्या हलगर्जीपणाबद्दल, किंवा राजकीय पक्षोपपक्षांच्या विचारसरणीबद्दल, माणसाच्या तक्रारी असतातच; इतकेंच नव्हे तर, आमटींत मीठ कमी पडल्याबद्दल, धोब्यानें कपडे फाडल्याबद्दल, किंवा पांच रुपयाला चप्पल महाग पडल्याबद्दलही, त्याच्या तक्रारी असतात! माणूस केव्हां, कोठें आणि कुणाविरुद्ध तक्रार करील याचा नेम नाहीं.

तक्रार करण्यास माणसाला फार मोठें कारण लागतें असें नाहीं. किंवा लहानसें तरी कारण लागतें असें नाहीं. अगदीं कारणाशिवाय माणूस तक्रार करूं शकतो.

"आज हवा चांगली नाहीं बुवा." ही सर्वसाधारण तक्रार माणसाची नेहमींच असते. हवामानाविरुद्ध आणि निसर्गाविरुद्ध तक्रार करण्यास माणूस नेहमीच उत्सुक असतो. माणसाचें संपूर्ण समाधान करून त्याची तक्रार दूर करण्यास बिचारा निसर्ग असमर्थ ठरला आहे! नोकरानें कितीही चांगलें काम केलें तरी मालकाची तक्रार असतेच, त्याप्रमाणें निसर्गानें प्रसन्न वातावरण राखण्याचा कितीही प्रयत्न केला तरी लोकांची तक्रार असतेच.

उन्हाळा, पावसाळा आणि हिंवाळा, या तीन्ही

ऋतूंत माणसाची कुरकूर अखंड चालू असते. दरवर्षी उन्हाळा आला कीं, तो मागच्या वर्षापेक्षां तापदायक असल्याचा भास होऊन जीव कासावीस होतो आणि कधीं एकदां थंडगार पावसाळा येईल याची माणूस उत्कंठेनें वाट बघतो. आणि प्रत्यक्ष पावसाळा आल्यानंतर तो पुन्हां चिडतो. पावसाचा तो भयंकर कहर, रस्तोरस्तींचा चिखल, छत्रीची मोडतोड, इत्यादि पाहून तो वैतागून जातो आणि हे दिवस कधीं संपतील असें त्याला होऊन जातें. पुढें ते दिवस संपून हिंवाळा आल्यानंतर थंडीनें त्याच्या दांतखिळ्याच बसतात. एकंदरींत बाराही महिने माणूस निसर्गाविरुद्ध तक्रार करीत असतो.

घरांतल्या घरांतसुद्धां माणसाच्या अनेक तक्रारी असतात. चहांत साखर कमी घातल्याबद्दल नवरा आपल्या बायकोजवळ तक्रार करीत असतो, तर रेशनची साखर अपुरी पडत असल्याबद्दल बायकोची उलट तक्रार असते. स्वयंपाक लौकर होत नाहीं म्हणून नवरा तक्रार करतो, तर कोळसेच थंड आहेत म्हणून बायको तक्रार करते. घरांत पुरुषापेक्षां स्त्रीच्याच तक्रारी अधिक असतात. नळाला पाणी नसल्याबद्दल, नवीन लुगड्याचा रंग गेल्याबद्दल,

रेशनचें धान्य खराब असल्याबद्दल, शेजारची बाई भांडखोर असल्याबद्दल, एक ना दोन, शेंकडों तक्रारी बायकोकडून ऐकून घ्याव्या लागतात !

दिवसभर तक्रार करणारा माणूस रात्रीं तरी बिनतक्रार स्वस्थ झोंपतो का ? छे ! मध्यरात्रीं झोंपेंतून उठून तो तक्रार करीत असतो ! घरांत ढेंकूण फार झाल्यामुळें झोंप येत नाहीं अशी तो तक्रार करतो, तर त्याची बायको आपल्या सुकोमल गालाला मच्छर चावल्याची तक्रार करते. नंतर दोघेंही मिळून घरवाल्याला आणि म्युनिसिपालिटीला शिव्या देत असतात.

जगांत आणखी एक सर्वसामान्य तक्रार जिकडे तिकडे ऐकूं येते. आणि ती म्हणजे पगाराबद्दलची ! प्रत्येकाला आपला पगार कमीच वाटतो आणि या अपुऱ्या वेतनाविरुद्ध त्याची नेहमीच तक्रार असते. कितीही पगारवाढ केली, तरी माणसाची ही तक्रार कायमच असते.

'आपल्याला वेळ नाहीं' अशी एक तक्रार सन्मान्य माणसांत रूढ आहे. विशेषतः नामवंत लेखक आणि पुढरी 'आपल्याला वेळ नाहीं' अशी तक्रार नेहमीच करतात.' या तक्रारीमुळें त्यांचा अधिकच भाव

वाढतो आणि कसेंही करून वेळांत वेळ काढा, अशी आपण त्यांना विनंती करतों.

याउलट, वेळच जात नाहीं अशी तक्रार करणारे महाभागही बरेच आढळतात. कित्येक खुशालचेंडू आणि रिकामटेकडे लोक लांबलांब दिवसाकडे आणि रात्रीकडे पाहून जांभया देत म्हणतात, ‘ छे बुवा ! वेळच जात नाहीं ! ’

हें सर्व पाहतां, तक्रार करायला माणसाला कांहीं विशेष कारणाची जरूरीच नाहीं ! सकारण किंवा अकारण माणूस तक्रार करीतच असतो. तक्रार करणें हा माणसाचा स्वभावधर्मच आहे.

# मृत्युलेख

२

वर्तमानपत्रकार या नात्यानें मृत्युलेख लिहिण्याचे प्रसंग माझ्यावर नेहमीच येतात. या जगांत कोणी ना कोणी थोर माणूस मधून मधून मेलेलाच असतो, आणि त्या त्या वेळीं, त्याचा मृत्युलेख लिहिणें भागच असतें. मेल्यानंतर त्या थोर माणसाची उणीव आपणांस फारच भासूं लागते आणि कधींही भरून न निघणारी हानि झाली म्हणून आपण हळहळत असतों! सर्व मतभेद बाजूला ठेवून, मेलेल्या माणसाचा आपण गौरव करीत असतों आणि ईश्वर मृतात्म्यास शांति देवो म्हणून प्रार्थना करीत असतों!

पण ज्यांच्या मृत्यूबद्दल वर्तमानपत्रांत चार ओळीही

येत नाहींत, अशीं किती तरी माणसें रोज मरत असतात! वर्तमानपत्रांनीं नोंद घेण्याइतकें त्यांच्या मृत्यूला सार्वजनिक महत्त्व नसतें. कारण ते सामान्य लोक असतात. अशा सामान्य माणसाच्या मृत्यूचें कोण कौतुक करील आणि वर्तमानपत्रांत त्याची निधनवार्ता कशी येईल? एखाद्या मोटारीखालीं तो अपघातानें मेला तरच त्याची मृत्युवार्ता छापून येण्याचा संभव! तो सरळ मेला तर त्याला हा चान्स नाहीं!

वर्तमानपत्रांत मृत्युलेख येण्यास खरोखर भाग्य लागतें. रोज हजारों लोक मरतात, पण एखाद्याचाच मृत्युलेख वर्तमानपत्रांत झळकतो. माणूस जितका मोठा, त्या मानानें त्याचा मृत्युलेखहि मोठा! मेलेल्या माणसाची योग्यता, मृत्युलेखामुळें आपणांस अधिकच कळून येतें. जिवंतपणीं एखाद्या माणसाच्या अंगांत कधींही न आढळलेले गुण, आपणांस त्याच्या मृत्युलेखांत वाचावयास मिळतात. कित्येक मृत्युलेख अत्यंत स्फूर्तिदायक असतात. मयत इसमाचें अपुरें राहिलेलें कार्य पूर्ण करण्याची आपण प्रतिज्ञा करतों, मयत इसमाचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवतों, मयत इसमाचें स्मारक करण्यासाठीं फंडही गोळा करतों.

पण वर्तमानपत्रांत ज्यांचे मृत्युलेख येत नाहींत,

अशा सामान्य माणसांमध्यें थोर लोक नसतात का? या सामान्य माणसांमध्यें किती तरी सज्जन, किती तरी प्रेमळ, किती तरी धर्मशील, किती तरी चारित्र्यवान, असे महाभाग असतात. हे बिचारे मृत्युलेखाला पारखे झालेले असतात. मेल्यानंतर घरांत किंवा गल्लींतच त्यांचा गवगवा होतो. पण वर्तमानपत्राच्या कचेरीपर्यंत ती बातमी पोंचूं शकत नाहीं. याचें कारण, जिवंत असतांना कोणत्याच क्षेत्रांत त्यांनीं प्रसिद्धि मिळविलेली नसल्यामुळें, मेल्यानंतर त्यांचे मृत्युलेख वर्तमानपत्रांत येऊं शकत नाहींत! हे लोक गुपचूप जगतात आणि गुपचूप मरतात! हजारों वाचकांना त्यांची दादखबरही नसते! मृत्युलेखाची योग्यता असूनही केवळ वर्तमानपत्री प्रसिद्धीच्या अभावीं त्यांचें मरण फुकट जातें!

माझ्या आयुष्यांत किती तरी चांगले चांगले लोक फुकट मरून गेलेले मीं पाहिले आहेत. माझ्या परिचयांतलीं आणि परिवारांतलीं किती तरी भलीं माणसें गुपचूप स्वर्गवासी झालीं आहेत! माझ्या हातांत वर्तमानपत्र असूनही त्यांचा मृत्युलेख लिहिण्याची मला सोय नाहीं. कारण त्यांना कोणतीच सामाजिक कीर्ति किंवा वर्तमानपत्रीं प्रसिद्धि लाभलेली

नाहीं ! आणि दुर्दैव हें कीं, मूठभर वाचकही त्यांना ओळखीत नाहींत ! ज्यांना वाचक ओळखीत नाहींत, त्यांचा मृत्युलेख काय लिहिणार, कपाळ !

पण मला मात्र, या सर्व प्रेमळ मृतात्म्यांबद्दल अत्यंत हळहळ वाटते. विशेषतः त्यांच्या मृत्यूसंबंधीं मी चार ओळीही लिहूं शकत नाहीं, या जाणीवेनें तर माझ्या हृदयाला दारुण यातना होतात ! वास्तविक त्यांची योग्यता फार मोठी असते. पण मृत्युलेखाला आवश्यक अशी प्रसिद्धि त्यांना लाभलेली नसल्यामुळें त्यांच्यासंबंधीं कांहीं लिहिण्याची मला सोय नसते ! सचोटी, प्रामाणिकपणा, औदार्य, सहनशीलता, त्याग, इत्यादि गुणांनीं मंडित असे स्त्रीपुरुष गल्लोगल्लींत मयत असतात ! पण त्यांची दखल कोण घेतो ! प्रसिद्धि-पराङ्मुख असे व्यासंगी व बुद्धिमान लोकही काय थोडेथोडके आहेत ? पण हे सारे गुपचूप जगतात आणि गुपचूप मरतात ! या सर्व थोर मृतात्म्यांना मूक अभिवादन करण्यापलीकडे मी तरी काय करणार ?

## कावळा

३

माझ्या घरच्या खिडकीच्या तावदानावर, रोज एक कावळा कांहीं वेळ येऊन बसतो. भिडस्त पाहुण्याप्रमाणें तो फार थोडा वेळ बसून उडून जातो. कधीं सकाळीं तर कधीं दुपारीं, त्याच्या लहरीप्रमाणें तो येत असतो. मान वांकडी करून तिरप्या नजरेनें तो माझ्याकडे पाहतो आणि दोन चार कर्कश आलाप काढून, आपल्या विशिष्ट भाषेंत बोलतो. त्याच्या बोलण्याचा अर्थ मला कळत नाहीं; तरी पण मी त्याचें बोलणें शांतपणें ऐकून घेतों. कधीं कधीं तो फार घाईत असतो. अशा वेळीं खिडकीला नुसते पाय लावून, उडतें दर्शन देऊन तो निघून जातो.

आज किती दिवस झाले, त्या कावळ्याचा हा उपक्रम चालू आहे. त्याच्या दर्शनानें किंवा ओरडण्यानें मी कधींही संत्रस्त झालों नाहीं. त्या कावळ्याला मी कधींही हांकलून लावीत नाहीं. उलट, तो आला म्हणजे त्याच्या हालचालींकडे मी कौतुकानें पाहत असतों. कावळ्याकडे एवढया प्रेमानें पाहणें शहाणपणाचें खास नाहीं. कावळा म्हणजे कोणी असा देखणा प्राणी नव्हे, कीं माणसानें त्याच्याकडे तन्मयतेनें पाहावें! किंवा त्या कावळ्यापासून माझ्या लेखनाला स्फूर्ति मिळते, अशांतलाही भाग नाहीं! कावळ्याला वाङ्मयांत स्थानच नाहीं! कावळा हा लेखाचा किंवा काव्याचा विषय होऊंच शकत नाहीं! कोणत्याही लेखकानें किंवा कवीनें कावळ्याचें कधींच कौतुक केलें नाहीं. कवीच्या सौंदर्यदृष्टींत कावळ्याचें रूप कसें काय भरणार? रूप नाहीं, रंग नाहीं, गुण नाहीं, स्वर नाहीं, असा हा नतद्रष्ट प्राणी वाङ्मयसेवकांवर काय परिणाम करणार?

तरी पण खिडकीच्या तावदानावर येऊन बसणाऱ्या कावळ्याकडे मी टक लावून पाहत असतों. याचें कारण त्या प्राण्याबद्दल मला अत्यंत सहानुभूति वाटते. पक्षीगणांमध्यें अत्यंत अभागी व कर्मदरिद्री जर

कोणता पक्षी असेल तर तो कावळा! अस्मानांत भ्रमण करणाऱ्या, रानावनांत बागडणाऱ्या हजारों पक्ष्यांमध्यें कावळ्यासारखा दुर्दैवी कोणीच नाहीं !

कावळ्याला पोपटासारखा रंग नाहीं किंवा कोकिळे-सारखा आवाज नाहीं ! त्याच्याजवळ कबूतराची चाल नाहीं किंवा मोराचें नर्तन नाहीं ! त्याच्याजवळ गरुडाची भरारी नाहीं किंवा हंसाची गुणग्राहकता नाहीं. चक्रवाकामप्राणें तो प्रीतीचीं गाणीं आळवीत नाहीं, किंवा चातकाप्रमाणें पावसाची प्रतीक्षा करीत नाहीं ! रसिकाच्या मनाला मोह पाडणारा एकही गुण कावळ्याजवळ नाहीं ! कावळ्याजवळ कोणतेंच आकर्षण नाहीं !

उलट कावळा हा अत्यंत कुरूप, अत्यंत काळा, अत्यंत गलिच्छ, एका डोळ्यानें आंधळा, कर्कश सुरांत ओरडणारा, असा ओबडधोबड वेडावांकडा प्राणी आहे ! कावळ्याबद्दल कोणी चांगले शब्द बोलत नाहींत, उलट शिव्याशाप मात्र त्याला देत असतात. कावळा, हा सर्वत्र तिरस्काराचा विषय झालेला दुर्दैवी प्राणी आहे !

कावळ्याबद्दल लोकमत जितकें वाईट आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याच पक्ष्याबद्दल नसेल ! कावळ्याबद्दल

अत्यंत दुष्ट म्हणी, आणि लोकापवाद आहेत. ‘कावळ्याच्या शापानें गाई मरत नाहींत’ ‘प्रासाद-शिखरावर बसला म्हणून कावळा कांहीं गरुड होत नाहीं’ ‘चुन्यांत डुंबला म्हणून कावळा कांहीं राजहंस होत नाहीं!’ ‘कावळा बसायला आणि फांदी मोडायला एकच गांठ!’ इत्यादि वाक्प्रचार कावळ्याची कुचेष्टा आणि अप्रतिष्ठाच करीत नाहींत काय?

कावळा हा छिद्रान्वेषी आहे, सर्वभक्षक आहे, अशी त्याची आणखी बदनामी केली जाते! काळ-तोंड्या आणि एकाक्ष म्हणून त्याची अपकीर्ति आहेच. शिवाय, मृताच्या पिंडावर तुटून पडण्याच्या त्याच्या स्वभावामुळें, त्याच्या अभद्रपणाचा खूपच डंका वाजला जातो! एकंदरींत कावळा हा अत्यंत अवलक्षणी व अवगुणी प्राणी समजला जातो.

कावळ्याचें हें सर्व दुर्दैव पाहिलें कीं या अभागी प्राण्याबद्दल दया वाटूं लागते! सर्वांच्या तिरस्काराला आणि अवहेलनेला पात्र झालेला हा कापाळकरंटा पक्षी जेव्हां माझ्या खिडकीच्या तावदानावर येऊन बसतो, तेव्हां त्याच्याकडे सहानुभूतीची नजर टाकल्याशिवाय मला राहवत नाहीं!

## संगतीचा परिणाम ! ४

कांहीं दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांत एक महत्त्वाची बातमी माझ्या वाचनांत आली. कराची येथें सेक्रेटरियटच्या आवारांत सुमारें एक हजार गाईबैलांची मिरवणूक आली, अशी ती बातमी होती.

त्या जनावरांना आपलीं कांहीं गाऱ्हाणीं मुख्य मंत्र्यांजवळ मांडायचीं होतीं. मिरवणूक शांतपणें आणि मोठ्या शिस्तीनें आली. घोषणा वगैरे कांहीं नव्हत्या. कारण त्या बिचाऱ्या मूक प्राण्यांना वाचाच नसल्यामुळें घोषणा करणें त्यांना शक्यच नव्हतें. पण त्यांना जें कांहीं म्हणावयाचें होतें, तें त्यांच्या गळ्यांत अडकविलें होतें. 'आम्हाला अधिक चारा द्या !' असे फलक त्यांच्या गळ्यांत लटकत होते !

खरें म्हटलें तर, असे फलकही गळयांत लटकवून घेण्याचें त्यांना कारण नव्हतें. कारण त्यांच्या अस्थिपंजर शरीरयष्टीवरून त्यांची तक्रार सहज कळून येण्यासारखी होती. पण चळवळ सनदशीर व स्पष्ट असावी; म्हणून त्या गाईबैलांनीं गळयांत पाट्या अडकवून घेतल्या होत्या !

ही मिरवणूक सेक्रेटरियटच्या आवारांत येतांच, मिरवणूकवाल्यांच्या पुढाऱ्यांना भेटून बातचीत करण्यासाठीं मुख्य मंत्रि लगबगीनें बाहेर आले. सरकारी खात्याच्या हा शिरस्ताच आहे. एखादी मिरवणूक कांहीं गाऱ्हाणीं घेऊन आली तर तिच्या पुढाऱ्यांना भेटून, कांहीं तरी आश्वासन देणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें कर्तव्यच आहे !

या रिवाजाप्रमाणें मुख्य मंत्रि त्या जनावरांच्या पुढाऱ्याचा शोध करूं लागले. पण एकही पुढारी त्यांना सामोरा येईना ! त्या जनावरांनाही मोठा पेंच पडला असावा. आपल्यामधून पुढारी कोणता निवडावा, आणि निवडलाच तर तो मुख्य मंत्र्याशीं संभाषण कसें करील, ही त्यांना विवंचना पडली ! त्यांच्या मुद्रेवर त्या वेळीं काय भाव उमटले ते मला

पाहवयास मिळाले नाहींत. पण बहुतेक त्यांचा असाच गोंधळ उडाला असेल !

पण जनावरांच्या त्या संकटाला कराचीचे मेयर धांवून आले ! त्यांनीं त्या गुरांच्या वतीनें मुख्य मंत्र्यांजवळ भाषण केलें आणि त्यांचीं गाऱ्हाणीं समजावून सांगितलीं ! जनावरांनींही सुटकेचा श्वास टाकला ! परमेश्वरानें आपणांस वाचा दिली नसली तरी, जोंपर्यंत माणसांना वाचा आहे, तोंपर्यंत भिण्याचें कारण नाहीं, असें त्यांना वाटलें !

असो. सांगण्याचें तात्पर्य, आज माणसांप्रमाणें जनावरांनाही अन्नटंचाई तीव्र भासत आहे ! वैरण भरपूर मिळत नसल्यामुळें त्यांची उपासमार चालू आहे. इतके दिवस पुण्याच्या टांग्याचे घोडेच तेवढे मरतुकडे व रोड दिसत असत. पण सध्यां हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं गुरेंढोरें दाणागोट्याच्या अभावीं अर्धपोटी जीवन कंठीत आहेत ! माणसाप्रमाणें आपल्या दुःखाला वाचा फोडण्याची त्यांना सोय नाहीं. उलट, अर्धा घांस चघळीत असतांना पाठीवर बसणारा धन्याचा चाबूक मुकाट्यानें तीं सहन करतात !

जनावरांसारख्या निरपराधी मूक प्राण्यांच्या वांट्याला ही उपासमार कां यावी ? माणसाला

जाणवणारा अन्नदुष्काळ हा त्या माणसाच्या कर्माचें फळ होय ! माणूस आपल्या कर्मानेंच स्वतःवर संकट ओढवून घेतो. काळाबाजार, नफेबाजी, सांठेबाजी, वाहतुकीची अडचण, युद्ध-परिस्थिति, या सर्व मानव निर्मित भानगडी आहेत आणि त्यांचे परिणाम माणसाला भोगावे लागल्यास नवल नाहीं ! पण, गुराढोरांनीं असें काय पाप केलें आहे म्हणून माणसां-प्रमाणें त्यांनींही अन्नदुष्काळाला बळी पडावें ?

याचें कारण एकच, आणि तें म्हणजे माणसाचा सहवास ! गाई, म्हशी, बैल, घोडे, हे आज कित्येक वर्षांपासून माणसाचा सहवास धरून आहेत. माणसाच्या कृपाछत्राखालीं वावरत आहेत. म्हणूनच माणसाची संगत त्यांना बाधली आहे ! जे वाघ आणि सिंह माणसांपासून दूर अशा जंगलांत आहेत, ते पोटभर खाऊन पिऊन मस्त आहेत. आणि ज्या मूर्ख जनावरांनीं माणसांची सोबत धरली, ते आज माणसांच्या दुःखाचे वांटेकरी झाले आहेत !

## वाढत्या वयाची जाणीव !



माणूस जन्माला आल्यानंतर आपलें वय मोजीत बसतो, ही एक मनोरंजक घटना होय ! वय मोजण्याच्या या प्रकारामुळेंच बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य यांच्या सीमा माणसाला कळूं लागतात. नाहीं तर एखादा माणूस नेहमींच पोर राहिला असता, नेहमींच तरुण राहिला असता, किंवा अकालींच म्हातारा म्हणून मिरवूं लागला असता ! पण वयाची मोजदाद होऊं लागल्यामुळें हा गोंधळ होऊं शकत नाहीं आणि माणसाला आपल्या वयोमानाप्रमाणें आपण कोण आहोंत हें कळण्याची सोय झाली आहे !

वय मोजीत बसण्याच्या या खटाटोपांतून आणखी

एक गोष्ट निर्माण झाली आहे. माणसाला आपला वाढदिवस साजरा करण्याची योजना सुचली आहे. वय जितकें अधिक, त्या मानानें वाढदिवस साजरा करण्याचा थाट मोठा! एकसष्टीला तर समारंभाचा कळस होतो! मानपत्र, थैली आणि शुभ संदेश, यांचा या वेळीं पाऊसच पडतो!

आजकाल अनेक थोरामोठ्यांचे वाढदिवस साजरे केले जातात. चाळीसावा, पन्नासावा, साठावा, अशा वाढदिवसांच्या बातम्या नेहमी वर्तमानपत्रांतून आपण वाचीत असतों. सार्वजनिक कार्यकर्ते, देशभक्त, पुढारी, साहित्यसेवक, राजेमहाराजे, यांचेच नव्हे, तर सिनेमा नटी आणि कांदेबटाट्यांचे व्यापारी, यांचेही वाढदिवस मोठ्या उत्साहानें आणि थाटामाटानें साजरे केले जातात. कांहींजण स्वतःचा वाढदिवस स्वतःच साजरा करून घेतात, तर कांहीं जणांचे वाढदिवस इतर लोक साजरे करतात! कांहीं जणांना आपला वाढदिवस साजरा करण्याची इच्छा नसते, पण प्रेमळ हितचिंतकांच्या आग्रहापुढें त्यांचा इलाज चालत नाहीं!

माणसाचा वाढदिवस साजरा होणें ही शुभ गोष्ट आहे. पण त्याचबरोबर वाढत्या वयाची जाणीव

तापदायक आहे ! प्रत्येक वाढदिवसाबरोबर आपण अधिकाधिक म्हातारा बनत चालल्याची जाणीव होऊन, आपली कंबर खचून जाते ! चांगल्या आनंदांत काळ कंठणाऱ्या माणसाला वर्षांतून एकदां मध्येंच ' अरे, तूं म्हातारा झालास ! ' म्हणून दरडावण्यासारखाच प्रकार आहे हा ! रमणीय अशा स्वप्नसृष्टींतून कठोर वास्तवतेकडे माणसाला पाहावयास लावणारा दिवस म्हणजे वाढदिवस !

माणूस आपलें वय मोजण्याच्या भरीस पडला नसता आणि आपली जन्मतारीखही त्यानें नोंदून ठेवली नसती, तर त्याच्यावर वाढदिवासाची ही आपत्ति आली नसती !

कधींकाळीं मी पन्नास किंवा साठ वर्षांचा होईन ही कल्पनाच मला सहन होत नाहीं. पण काळ हा असा कांहीं क्रूर आहे कीं तो पुढें पुढें जात असतो आणि माणसाच्या तारुण्याला व भावनेला न जुमानतां, त्याच्या वयांत भर घालीत असतो.

खरोखर, शहाण्या माणसानें आपली जन्मतारीख आणि वय विसरण्याचा प्रयत्न करावा. आपण कोणत्या सालीं जन्मलों आणि आज आपलें वय किती याचा जर आपणांस पत्ताच नसेल, तर प्रत्येकाला

सोईस्कर रीतीनें नेहमीच तरुण राहतां येईल. पुष्कळ वेळां असें घडतें कीं आपल्या अंगांत तारुण्य आणि उत्साह भरपूर असतो; पण वाढत्या वयाच्या जाणीवे-नेंच आपण म्हातारे बनतों ! ही जाणीवच आपला अवसानघात करते !

म्हणून आपलें वय विसरून जाणें हा एकच, त्या वयाला टक्कर देण्याचा सोपा उपाय आहे !

पण नांवलौकिकास चढलेले जे थोर लोक आहेत, त्यांना हें शक्य नसतें. थोर माणसाला आपलें वय विसरून जाण्याची सोयच नसते ! त्यानें तें विसरण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी लोक त्याच्या वयाची मोजदाद करून, त्याचा वाढदिवस साजरा करण्यास दरवर्षी टपलेले असतात ! निदान एकसष्टी तरी त्याला टाळतां येत नाहीं !

## जगण्याचा टॅक्स



मनुष्यप्राणी हा टॅक्स भरणारा प्राणी आहे. या जगांत जिवंत राहण्यासाठीं आपणांस कर भरावा लागतो. केवळ सरकारला आणि म्युनिसिपालिटीलाच आपण कर देतों असें नाहीं; तर कळत किंवा नकळत अनेकांना आपण कर देत असतों.

माणसाला या जगांत जगायचें असेल तर त्यानें जगण्याचा कर दिलाच पाहिजे. हा कर भरल्यावांचून त्याची सुटकाच नाहीं. छे! त्याला जगतांच येणार नाहीं! कर भरल्यावांचून जगणें म्हणजे जवळ जवळ मरणेंच, असें त्याला वाटेल!

आपल्या दैनंदिन जीवनांत जगण्याचा हा कर

आपण नेहमीं देत असतों. आपली इच्छा असो वा नसो, पण हा कर वसूल केला जातोच.

तुम्ही म्हणाल, हा जगण्याचा कर तो वेगळा कसला! सरकारला कर दिल्यानंतर आपण कुठें इतरांना कर देत असतों?

पण मेहेरबान, खिशांत हात घालून जरा विचार करा! रोज आपल्या खिशांतून किती पैसे निष्कारण उडून जातात!

रस्त्यांत भेटणारे भिकारी, वर्गणी मागण्यास येणारे फंडगुंड, अचानक येणारे पाहुणे, गर्दींत खिसे कापणारे चोर, हे सर्व आपल्याकडून कर वसूल करणारे प्राणी होत. या सर्वांपायीं पदराला खार लावून घेतल्याशिवाय, आपल्याला जगतांच येणार नाहीं. खुषीनें किंवा नाखुषीनें आपण लुबाडले जातों. यालाच जगण्याचा टॅक्स म्हणतात!

तुम्ही म्हणाल हा टॅक्स दिलाच पाहिजे अशी सक्ति कुठें आहे? हा टॅक्स दिल्याशिवाय आपल्याला जगतां येणार नाहीं काय?

मी म्हणतों, नाहीं! तुम्हाला शांति आणि समाधान लाभणार नाहीं. तुम्हाला जीवन असह्य वाटेल. तुमचें मनःस्वास्थ्य पार बिघडून जाईल. जगण्याचा टॅक्स

जर तुम्ही टाळूं लागाल तर तुम्हाला तें जगणें नकोसें होऊन जाईल! म्हणून तुम्हाला सुखानें, आनंदानें आणि अन्नूनें जर या जगांत जिवंत राहावयाचें असेल, तर जगण्याचा कर तुम्हीं भरलाच पाहिजे.

आणि जगण्याचा कर टाळण्याचा तुम्ही किती म्हणून प्रयत्न कराल? रस्त्यावरच्या किती भिकाऱ्यांना गचांडी मारून तुम्ही सुरक्षित पार पडाल? शेवटीं कंटाळून एखाद्याच्या अंगावर चारदोन पैसे तुम्ही फेंकणारच! भूतदया म्हणून म्हणा, किंवा 'जाऊं द्या ही कटकट' म्हणून म्हणा, तुम्ही खिशांतले कांहीं पैसे भिकाऱ्याला देणारच! कित्येक वेळा स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं आणि मनः-स्वास्थ्यासाठीं तुम्ही भिकाऱ्यांना पैसे देत असतां! यालाच जगण्याचा टॅक्स म्हणतात! नाहीं तर हे लोक आपल्याला जगूं देत नाहींत! या लोकांनीं आपणांस जगूं द्यावें म्हणून आपण त्यांना खुषीनें किंवा नाखुषीनें टॅक्स देत असतों.

सार्वजनिक कार्यासाठीं किंवा गल्लींतल्या सत्य-नारायणासाठीं वर्गणी मागण्यास येणारे लोक आपणांकडून जगण्याचा टॅक्स वसूल करून जातात. या लोकांना 'नाहीं' म्हणण्याची सोय आहे का?

कांहीं माणुसकी, धार्मिक बुद्धि आपल्याजवळ आहे की नाहीं ? आणि कद्रूपणाचा आरोप आपण कां म्हणून घ्या ! लोकापवादासाठीं म्हणून म्हणा किंवा स्वतःच्या भिडस्तपणामुळें म्हणा, आपण मुकाट्यानें वर्गणी देतों. वर्गणीचा हिशेब वगैरे पाहण्याची आपली अपेक्षा नसते, तरीसुद्धां आपण पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेत असतों. याला जगण्याचा टॅक्स म्हणूं नये तर काय ! तुम्हाला सुखासमाधानानें जगायचें असेल, तर एवढा दंड तुम्ही सोसलाच पाहिजे !

चोर आणि खिसेकापू हे सुद्धां आपल्याकडून टॅक्स वसूल करतात ! रस्त्यांत आपला खिसा कापला जातो किंवा फाउन्टन् पेन लांबविलें जातें. पण याबद्दल दुःख करून चालणार नाहीं ! तुम्हाला रस्त्यांत भटकायला पाहिजे, गर्दींत उभें राहून गंमत पाहायला पाहिजे; मग त्यासाठीं एवढा टॅक्स नको का भरायला ?

एखाद्याला पैसे उसने देत असतांना, आपण जगण्याचाच टॅक्स देत असतों. कारण, त्या माणसा-कडून आपल्याला पैसे परत मिळणार नाहींत याची आपल्याला खात्री असते. तरीसुद्धां आपण त्याला

उसने पैसे देतों ! अगदींच हिशेबीपणानें आपल्याला जीवन जगतां येत नाहीं ! वेळप्रसंगीं नागवणूक, फसवणूक, लुबाडणूक, आपण करून घेतली पाहिजे. कांहीं कांहीं वेळेला पैसा अगदीं वाऱ्यावर सोडला पाहिजे. जगण्याचा आवश्यक टॅक्स भरल्यावांचून आपल्याला गत्यंतर नाहीं !

## जरा हळू

७

दिवसेंदिवस माणूस हळू बोलूं लागला आहे. एक-जण दुसऱ्याशीं बोलतांना इतकें हळू बोलतो कीं तिसऱ्याला तें कळावयाचें नाहीं. आजकाल माणूस हा बोलत नसून, कुजबुजत आहे, कानांत कांहीं तरी सांगत आहे! कुठेंही पहा, सारें जग कांहीं तरी खाजगी बोलण्यांत आणि हलक्या आवाजांत कुज-बुजण्यांत गढून गेलें आहे, असेंच तुम्हास दिसून येईल.

माणसाच्या वाणीमध्यें आज आवाज उरला नाहीं, जोर उरला नाहीं, मोकळेपणा उरला नाहीं. त्याचा सूर नरम व थंड पडला आहे. माणसांचे सर्व व्यवहार

व कारभार जणूं आंतल्या आवाजांत चालले आहेत. आजकाल माणूस हलक्या आवाजांत कां बोलतो तें समजून घेणें मनोरंजक होईल.

वाणी ही मानवाला लाभलेली मोठी देणगी आहे. परस्परांचे मनोगत, विचार, भावना, सर्व कांहीं वाणीच्या द्वारेंच व्यक्त होऊं शकतात. वाणीमुळें प्रेमळ स्नेहसंबंध जोडले जातात आणि वाणीमुळें भांडण-तंटेही निर्माण होतात. स्तुति करणें आणि निंदा करणें हें वाणीमुळेंच साध्य झालें आहे. परमेश्वराचें भजन आणि शृंगारिक लावणी, मधुर गायन आणि कंटाळवाणें व्याख्यान, गोडगोड गप्पा आणि वायफळ थापा, या सर्व बऱ्यावाईट प्रकारांना वाणीच जबाबदार आहे. राजकीय वाटाघाटी चालविणें किंवा फिसकटून टाकणें, दमबाजी देणें अथवा क्षमा मागणें, हे सर्व वाणीचेच चमत्कार आहेत.

अशी ही सर्वगुणसंपन्न वाणी माणसाला लाभलेली आहे. जो तो आपापल्या परीनें तिचा उपयोग करीत असतो. पण आजकाल माणसानें या वाणीचा उच्चार हलक्या आवाजांत करावा, याचा अर्थ काय ? माणूस पूर्वीप्रमाणें मोठ्यानें व उघडपणें कां बातचीत करीत नाहीं ? मोठ्यानें बोलण्यास माणसाला भीति, लाज

किंवा संकोच वाटतो काय? आजकाल माणूस हळूच कां बोलतो याचें कारण शोधून काढणें कठिण नाहीं. माणसांचें जीवन भानगडींचें झालें आहे, म्हणून माणूस आज हळू बोलतो आहे. काळा बाजार, चोरटा व्यापार, बेकायदा व्यवहार, नफेबाजी, लांच-खाऊपणा, इत्यादि भानगडींमुळें माणसांच्या दैनंदिन जीवनांत एक प्रकारचा चोरटेपण निर्माण झाला आहे. घरांत, दुकानांत, रस्त्यांत, जिकडे तिकडे माणसें जणूं काय एकमेकांच्या कानांत बोलतात असेंच दृश्य दिसून येत आहे! जिकडे तिकडे कुजबूज, नेत्रसंकेत, गुप्त संभाषणें चालू आहेत. हळू बोलल्याशिवाय माणसाला आज गत्यंतरच नाहीं. आपलें बोलणें तिऱ्हाइतानें ऐकूं नये म्हणून जो तो फार सावधगिरी घेत असतो.

सत्यनारायणाच्या पूजेसाठीं जादा साखर काळ्या बाजारांतून पैदा करतांना वाण्याजवळ किती हळू बोलावें लागतें आपल्याला! आणि वाणीही मग डोळे मोडून आपल्याला कानांत भाव सांगतो! आणि मग आपणही 'कबूल' म्हणून त्याच्या कानांत उत्तर देतों. अशा प्रकारच्या अनेक चोरट्या व्यवहारांमुळें हळू बोलण्याची आपल्याला संवयच लागून गेलेली असते.

लांच देण्याच्या आणि घेण्याच्या प्रकारामुळेंही हळू

बोलण्याची फॅशन निर्माण झाली आहे. या गुप्त व्यवहारांत दोन्ही पक्षांचे संवाद इतक्या क्षीण आवाजांत चालतात कीं, त्यांचें त्यांनाच परस्परांचें बोलणें ऐकूं जात नाहीं. तरी पण उभयपक्षीं समाधानकारक तडजोड होऊन प्रकरण निकालांत लागतें. या व्यवहारांत गुन्हेगार हळू बोलतो आणि सरकारी अधिकारीही हळू बोलतो. चोरही हळू बोलतो. आणि पोलिसही हळू बोलतो. यावरून हळू बोलण्याच्या संवयीनें सर्वांनाच कसें झपाटलें आहे तें दिसून येतें.

हळू बोलण्याच्या या क्रियेला जातीय दंगेही फार हातभार लावीत आहेत. दंग्याच्या दिवसांत रोज भीतिग्रस्त अफवा उठत असतात. एकजण दुसऱ्याच्या कानांत हळूच कांहीं तरी सांगतो आणि घबराट पसरवितो ! या दंग्यामुळें हळू बोलण्यास भलतेंच उत्तेजन मिळत आहे !

बेकायदा दारूचा व्यापार आणि जुगार यांमुळेंही हळू बोलण्याचा फैलाव झपाट्यानें होऊं लागला आहे. एकजण दुसऱ्याच्या हातावर पावली ठेवून हळूच 'पंजा' म्हणतो आणि निघून जातो. दुसराही हळूच तिसऱ्याच्या कानांत असेंच कांहीं तरी हळू सांगतो ! हळू बोलण्याची माणसामध्यें जणूं चढाओढ लागलेली आहे !

माणसाच्या चोरट्या भानगडींत तर हळू बोलण्याला फार महत्त्व आहे. आजकाल चोरट्या रोमान्सचा फार सुळसुळाट झाला असल्यामुळें बागेंत, कुंजांत, हॅाटेलांत, फॅमिली रूममध्यें, सिनेमा थिएटरांत नुसती कुजबुज चाललेली असते. चोरून प्रेम करणाऱ्या जोडप्यांनीं हळू बोलण्याच्या कलेंत महत्त्वाची भर घातलेली आहे यांत शंका नाहीं.

शाळेंत मास्तराची झोंपमोड होऊं नये म्हणून मुलें हळूच अभ्यास करतात. आणि चाळींत बोभाटा होऊं नये म्हणून नवराही हळूच बायकोजवळ भांडतो. नोकरांनीं संप करूं नये म्हणून मालक दमदाटी न देतां त्यांच्याशीं हळू बोलतो आणि मालकाजवळ पगारवाढीची गोष्ट नोकरही हळूच काढतो.

यावरून आजकाल जिकडे तिकडे हळू बोलण्याचा कां प्रघात पडला आहे तें कळून येईल. माणसांच्या जीवनांत काळा बाजार, चोरटा व्यवहार वगैरे अनेक भानगडी निर्माण झाल्यामुळें या जगांत प्रत्येक व्यक्ति गुन्हेगाराप्रमाणें हळू बोलत आहे! माणसाच्या वाणींतील सामर्थ्य, जोर, प्रामाणिकपणा नाहींसा झाला आहे. सर्वच धंदे चोरून करावयाचे आणि सर्व भाषा चोरून बोलावयाची !

## गरजवंताला अक्कल असते

८

गरजवंताला अक्कल नसते असें म्हणतात. पण मला तें खरें वाटत नाहीं. उलट, गरजवंतालाच अधिक अक्कल असते, असें माझें मत आहे. गरजू माणूस नेहमीं आपलें डोकें चालवीत असतो, धडपड करीत असतो. आपली गरज भागविण्यासाठीं तो अनेक हिकमती करीत असतो. बिचारा बिनगरजू माणूस काय आपली अक्कल चालवील आणि कशाला म्हणून हालचाल करील?

गरजवंताला अक्कल नसते अशी जी म्हण आहे त्याला कारणही तसेंच आहे. गरजू माणूस हा लाचार बनतो, अगतिक बनतो, त्याच्या बुद्धीचा गोंधळ

उडतो आणि अशा त्या अडल्या परिस्थितींत वाटेल तो गाढवपणा करावयास तो तयार होतो, असें दिसून येत असल्यामुळेंच, गरजवंताला अक्कल नसते, असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. 'अडला हरि गाढवाचे पाय धरी' ही म्हण सुद्धां गरजवंताच्या लाचारींतूनच निर्माण झाली आहे.

पण खोल विचार करतां गरजवंताबद्दल इतका गैरसमज करून घेण्याचें कारण उरत नाहीं. गरज-वंत हा खरोखर लोक समजतात तितका बेअकली नसतो. गरज ही शोधाची जननी आहे असें म्हटलें आहे, आणि गरजेंतूनच अनेक नवीन नवीन शोध जन्मास येत असतात. त्या त्या वेळीं निर्माण झालेल्या गरजेमुळेंच मानवी बुद्धीनें अचाट कामें केलीं आहेत. विचार करण्याची शक्ति, धाडस करण्याची स्फूर्ति गरजेंतूनच माणसाला प्राप्त झालेली आहे.

गरजवंताला अक्कल नसते, असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. उलट वेळप्रसंगीं गरजवंत माणूस अशी कांहीं अक्कलहुषारी दाखवितो कीं लोकांनीं चकित होऊन त्याचें कौतुकच करावें !

माझेंच उदाहरण पाहा ! माझें कधीं काळीं लग्न होईल, यावर कुणाचाच विश्वास नव्हता. पण मला

गरज भासतांच मीं लग्न करून दाखविलें. एका फार शहाण्या मुलीला मीं असें कांहीं बनविलें, अशा कांहीं थापा दिल्या आणि तिला अशा कांहीं गोत्यांत आणलें कीं माझ्याशीं तिला लग्न केल्यावांचून सुटकाच नव्हती! आतां मला सांगा, माझ्यासारख्या बावळट माणसाच्या डोक्यांत एवढी कल्पकता कशी आली? एवढें चातुर्य कोठून आलें? गरजेंतूनच नाहीं का हा चमत्कार घडून आला? गरजवंताला नुसती अक्कल असते, इतकेंच नव्हे, तर त्याची विचारशक्ति वाढतच असते. गरजू माणूस हा सदैव गंभीर विचारांत गढलेला असतो. त्याच्या सुपीक डोक्यांत वैचारिक आंदोलन नेहमीं चालू असतें. या विचारांतून पुढें त्याला प्रकाश दिसत असतो.

'गरज सरो, वैद्य मरो!' ही म्हण सुद्धां गरजू माणसाच्या अक्कलहुषारीचाच डौल मिरवीत आहे. गरजेपुरतें एकाद्याला जवळ करून, गरज सरतांच त्याला दूर सारणें, हा मुत्सद्देगिरीचा कळस आहे! धूर्तपणाचें हें लक्षण आहे. याला मानसिक तयारीही खूप लागते. सर्वसाधारण माणसाला हें कृत्य उलट्या काळजाचें वाटेल. कारण उपकारकर्त्याबद्दल कृतज्ञता बाळगणें हा माणुसकीचा धर्म आहे, अशी समजूत

आहे. त्यामुळें जो आपली गरज भागविण्यास उपयोगी पडला, त्या उपकारकर्त्याकडे पाठ फिरविण्याचा दुष्टपणा सहसा कोणी करणार नाहीं. असें असूनही 'गरज सरो, वैद्य मरो !' ही म्हण प्रचारांत येण्याचें कारण काय? कांहीं भयंकर गरजू लोकांच्या कात्रे-बाज आणि कृतघ्न आचरणांतूनच या म्हणीचा जन्म झाला नाहीं काय?

माणसाला या जगांत कोणत्याही गोष्टीची गरज भासूं नये हें चांगलें. पण कधीं कधीं गरजेमुळेंच माणसांच्या अंगांत उदात्त गुण निर्माण होतात. विशेषत: धाडसीपणा हा गरजेंतूनच प्रगत होतो. उदाहरणार्थ गरजू संपादकाकडे पाहा. चांगलें लिखाण जवळ नसल्यामुळें मोठ्या फिकिरींत पडलेला तो गरजू संपादक शेवटीं वैतागून भिकार लेखकांचे सटरफटर लेख छापावयास देतो! त्याच्या या धाडसाचें कारण काय? गरजेमुळेंच एवढें धाडस करण्यास तो प्रवृत्त झाला नाहीं काय?

ऐन वेळीं आगगाडीचें तिकिट आपणांस मिळत नाहीं आणि आपल्याला प्रवासाची तर फार जरूरी आहे! अशा वेळीं आपण बेधडक बिनतिकिटानें प्रवास करितोंच कीं नाहीं! हा धाडसीपणा गरजें-तूनच आपल्या अंगीं निर्माण झाला नाहीं का?

गरजेमुळेंच माणूस आणखी कसा कसा धाडसी बनतो पाहा! चाळीस वर्षें ब्रह्मचारी जीवन कंठिलेल्या माणसाला पुढें लग्नाची गरज भासूं लागली तर तो किती धाडसी बनेल याचा विचार करा! एक तर तो चोरून धंदे करील किंवा उघड लग्न करील! या दोन्हीं गोष्टींना धाडस लागतें आणि हें धाडस गरजेंतूनच निर्माण होतें, हें निर्विवाद होय!

चाळीस वर्षें नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळल्यानंतर पुढें अगतिक होऊन लग्नास तयार होणें, याला तुम्हीं काय म्हणाल? पराभव? छे! हिंमत! धडाडी!

गरजेमुळेंच माणसांचें जीवन प्रगतिकारक बनत असतें यांत शंका नाहीं! गरजेंतूनच माणसाचा आर्थिक विकास आणि बौद्धिक विकासही होत असतो. माणसाला आर्थिक गरज भासूं लागली कीं, तो अधिक पैसे मिळविण्याची धडपड करीत असतो. आणि बौद्धिक गरज भासूं लागली कीं अधिक ज्ञान मिळविण्याचा खटाटोप करीत असतो. विज्ञानशास्त्रांतील नवीन नवीन शोधसुद्धां त्या त्या परिस्थितीच्या गरजेंतूनच निर्माण झाले. निरनिराळ्या रोगांवर नवनवीन योजना यासुद्धां गरजेंतूनच निर्माण झाल्या.

एकंदरींत माणसाची अक्कल, बुद्धि, कर्तबगारी या सर्वांच्या विकासाला गरज हेंच मुख्य कारण आहे. म्हणून माणूस हा नेहमीं गरजू असावा. त्याशिवाय त्याच्या अकलेचें चीज होणार नाहीं. ‘गरजवंताला अक्कल नसते’ असें जे म्हणतात, तें खोटें असून गरजवंतालाच खरी अक्कल असते.

# हुंड्याची चाल

१

या जगांत असे कांहीं भाग्यवान पुरुष आहेत, कीं त्यांना लग्नाच्या वेळीं बायको मिळते आणि वर हुंडाही मिळतो. अशा पुरुषांना बायकोसाठीं लग्न करावयाचें नसून, हुंड्यासाठीं तें करावयाचें असतें. पण हुंडा ही बायकोप्रमाणें फार वेळ टिकून राहणारी वस्तु नाहीं. हुंड्याचे पैसे संपून जातात आणि बायकोच तेवढी शिल्लक राहते !

हुंड्याची चाल चांगली आहे कीं वाईट आहे, तें मला नक्की माहित नाहीं. कारण, मला त्याचा अनुभव नाहीं. माझ्या लग्नाच्या वेळीं वधूच्या बापानें मला हुंडा देऊं केला असता, तर तो मीं नाकारला

असता कीं नाहीं, तें मीं सांगूं शकत नाहीं ! पण आज लग्नानंतर बऱ्याच वर्षांनीं मीही स्वतः मुलीचा बाप झालों असल्यामुळें हुंड्याच्या चालीविरुद्ध माझेंही मत बनूं लागलें आहे.

हुंड्याच्या राक्षसी रूढीबद्दल संतापानें लिहिण्या-सारखें आतां कांहीं उरलें नाहीं ! इतकें हुंड्याविरुद्ध लोकमत तयार झालें आहे. हिंदु समाजांतून ही घातुक चाल हळू हळू नष्ट होत आहे. सरकारही हुंड्याविरुद्ध कायदा करीत आहे. हुंडा देणें आणि घेणें गुन्हा ठरणार आहे, आणि नव्या संस्कृतींत वाढलेले आजचे तरुण आणि तरुणी, या हुंड्याचा पुरा बींमोड केल्याशिवाय राहणार नाहींत.

हुंड्याची चाल फार वाईट आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. गृहिणी म्हणून एखाद्या स्त्रीला पत्करतांना, तिच्या पालकाकडून पैसे उकळणें, हा अधमपणा होय. हुंड्यामुळें अनेक वधूपिते कर्जबाजारी झाले आहेत आणि कांहीं मुलींनीं आत्महत्याही केल्या आहेत.

पण त्याचबरोबर हुंड्याच्या राक्षसी रूढींत दडून बसलेली मानवताही लक्षांत घेतली पाहिजे. हुंड्याची

चाल जितकी वाईट आहे, तितकी ती चांगलीही आहे !

किती तरी कुरूप मुलींचीं लग्नें हुंड्यामुळेंच घडून आलेलीं असतात. प्रत्येक पुरुषाला वाटतें कीं आपली बायको रूपवान असावी. पण तो जाणून बुजून जेव्हां कुरूप मुलीशीं लग्न करतो, तेव्हां तो किती मोठा त्याग करतो ! या त्यागाचें मोल म्हणून त्यानें हुंडा कां घेऊं नये ? वधूपित्यानें हुंडयाच्या रूपानें केलेला त्याग हा जांवयाच्या त्यागापेक्षां कमीच आहे !

त्याचप्रमाणें कांहीं कांहीं अडकून पडलेलीं, रखडून राहिलेलीं लग्नें, हुंडयामुळेंच निर्विघ्नपणें पार पडूं शकतात. हुंडा हा लग्नांतील विघ्न दूर करण्याचा एक जालीम उपाय होय !

आपली मुलगी चांगल्या संपन्न घरांत पडावी, असें प्रत्येक प्रेमळ बापाला वाटत असतें. त्यामुळें विशिष्ट 'स्थळा'कडे चढाओढ लागलेली असते. या चढाओढींतून नवरदेवाचा लिलांव सुरू होतो आणि आंकडा वाढत जातो.

हुंडा हा कायद्यानें अजिबात बंद होऊं शकेल असें वाटत नाहीं. फार वाच्यता न करतां सासरा

आपल्या जांवयाला गुपचूप 'गुप्त दान' सहज देऊं शकतो. जोंपर्यंत या जगांत गरजू वधूपिते आणि संधिसाधु नवरदेव आहेत, तोंपर्यंत हुंड्याचा काळा बाजार चालूच राहणार !

आतां एखाद्या वधूपित्यानें खुणा केलेल्या नोटा जांवयाला देऊन, पोलिसांची धाड आणण्याची कारवाई केली, तरच त्या कायद्याचें कांहीं चीज होईल.

# आरसा

## १०

ज्यामध्यें आपण आपलें तोंड पाहतों, त्याला आरसा म्हणतात. किंवा ज्यामध्यें आपण आपलें तोंड पाहून, भलती समजूत करून घेतों, त्याला आरसा म्हणतात. माणसाला स्वतःचा चेहरा डोळ्याला दिसत नसल्यामुळें, तो कसा काय आहे, याविषयीं मोठें कुतूहल असतें. आणि हें कुतूहल आरसा निवारण करीत असल्यामुळें, माणसाला आरशाबद्दल एक प्रकारचा जिव्हाळा वाटणें साहजिक आहे.

पण प्रत्येकानें केवळ आपल्याला चेहरा आहे, म्हणून आरशांत पाहणें योग्य नाहीं. अज्ञानांत सुख असतें हें जाणून, कांहीं शहाणे लोक जर आपल्या

चेहऱ्याचें ज्ञान करून घेण्याचें टाळतील तर ते सुखी होतील ! कित्येक लोक आरशांत पाहून गांवांत तोंड दाखविण्यास लाजतात !

कांहीं जणांच्या बाबतींत आरसा हा मनस्तापाला कारण होत आहे. आपण कुरूप आहोंत किंवा बावळट आहोंत, आपण नकटे आहोंत किंवा धाकटे आहोंत, आपला डोळा तिरळा आहे, किंवा कान लांब आहे, अशा वेगवेगळ्या कल्पना माणूस आरशांत पाहून करून घेतो आणि दुःखसागरांत बुडून जातो. माणूस आरशांत पाहण्याच्या फंदांत पडला नसता तर या विवंचना करण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवला नसता !

मी ज्या ज्या वेळीं आरशांत पाहतों, त्या त्या वेळीं माझी दाढी वाढली असल्याचें मला दिसून येतें आणि मी कासावीस होतों. माझी दाढी वाढली आहे, ही जाणीव मला आरशाखेरीज दुसरा कोणीही करून देत नाहीं. किंवा माझी दाढी वाढल्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहींत किंवा कोणी टवाळी करीत नाहींत. पण आरशांत ती दाढी पाहिल्याबरोबर सारें जग माझ्याकडे तुच्छतेनें हंसत आहे, असाच मला भास होतो. आणि मग मी कुणाकडून तरी दोन आणे

उसने घेऊन न्हाव्याकडे पळत जातों! माझी इतकी विनाकारण तारांबळ उडविणारा आरसा, ही एक उपद्व्यापी वस्तु नाहीं काय?

आरशाची उपयुक्तता कोणी कितीही सांगो, पण मी तें मान्य करीत नाहीं. आरशामुळें माणसाच्या सौंदर्यांत, संस्कृतींत किंवा नीटनेटकेपणांत भर पडत आहे, हें कबूल करण्यास मी तयार नाहीं. उलट, माणसांमध्यें जें काय थोडेंबहुत सौंदर्य आहे, तें आरशामुळें नष्ट होत आहे, असें माझें प्रामाणिक मत आहे. सुंदर चेहऱ्याची स्त्री फाजील रंगरोगण करून व तोंडाला पावडर फांसून, स्वःताला हास्यास्पद आणि कुरूप करून घेते. केवळ आरशांत पाहून, तिला आपला चेहरा अधिक बिघडवून घेण्याचा मोह होतो!

ज्या स्त्रिया आपण कुरूप समजतों, त्या खरोखर तशा नसतात. पण आरशांत पाहून त्यांनीं तसा नट्टापट्टा केला असल्यामुळें, त्या आपल्याला कुरूप दिसतात. हा त्यांचा दोष नसून आरशाचा दोष आहे.

आरशांत पाहण्याच्या संवईमुळें माणसाचा बहुमोल वेळ वायां जात असतो. विशेषतः स्त्रियांचा तर बराच वेळ आरशामध्येंच जात असतो! वेळेच्या

अपव्ययाप्रमाणेंच पैशांचाही अपव्यय आरशामुळें होतो. रोज नवीन नवीन फॅशन करण्यापायीं विनाकारण पैसा खर्च होत असतो. आणि या सर्व अनर्थाला जबाबदार आरसा!

आरशामुळें माणसाचें डोकें फिरून त्याला वेड लागतें, हें आणखी एक दुर्दैव होय. कांहींजण आरशांत पाहून स्वतःशींच हंसतात, आरशांत डोळे मिचकावतात, सभेंत करावयाचें भाषण अगोदर घरीं आरशांत पाहून करतात! अशा प्रकारचे हे चाळे पाहिले म्हणजे, आरशाविषयीं भयंकरच धडकी भरते! अशा या आरशांत जाऊन तोंड पाहण्यापेक्षां त्याला लांबूनच नमस्कार करावा, असें वाटतें!

## घरांत आणि घराबाहेर ! ११

या जगांत माणसाला घरदार असणें हें प्रतिष्ठितपणाचें लक्षण समजलें जातें. घरदार असलेला माणूस हा कुटुंबवत्सल व अब्रूदार समजला जातो. याउलट, ज्याला घर नाहीं असा माणूस फटिंग व मवाली समजला जातो. घर नसलेल्या माणसाबद्दल समाजांत चांगलें मत नाहीं.

आणि घर नसलेल्या माणसाचीही चारचौघांत मोठी फजिती उडते. ‘ तूं कुठें राहतोस ? ’ असा जर त्याला प्रश्न केला, तर तो गोंधळून जातो ! ‘ घर ना दार देवळीं बिऱ्हाड ! ’ ही म्हणही अशा गृहहीन माणसाची नालस्ती करण्यासाठींच प्रचारांत आली असावी.

पण खरोखरच घराला एवढें महत्त्व आहे काय? घर असलेला माणूस हा घर नसलेल्या माणसापेक्षां श्रेष्ठ आणि सभ्य कां समजला जातो? घरदार असल्यामुळें माणसाच्या जीवनांत आणि स्वभावांत कांहीं क्रांति झाली आहे काय?

घर हें माणसाला आवश्यक आहे ही गोष्ट खरी. घरामुळें माणसाला गृहसौख्य लाभतें. थंडीवाऱ्यांत आसरा म्हणून, जेवणाखाण्याचें ठिकाण म्हणून, संसार करण्याचें स्थळ म्हणून घर हें ठीक आहे. पण घरामुळें माणसाचा दर्जा वाढतो आणि तो अब्रूदार बनतो, हें कबूल करण्यास मी तयार नाहीं! घरामुळें माणसाच्या संस्कृतींत आणि सज्जनपणांत भर पडत आहे, असें मला वाटत नाहीं!

खरें म्हटलें तर, माणूस घराबाहेरच अधिक शोभून दिसतो. घरांत तो तितकासा शोभून दिसत नाहीं. घराबाहेर अत्यंत सभ्य व संभावित दिसणारा माणूस, घरांत रानटीपणाचें वर्तन करतांना आढळून येतो. बाहेर कुणाशींही न भांडणारा माणूस, घरांत आपल्या बायकोशीं आणि इतर नातेवाईकांशीं भांडतो, पोराबाळांवर खेंकसतो आणि गडी माणसांना दम देतो. बाहेर खाणावळींत मुकाट्यानें जेवणारा माणूस

घरांत मात्र जेवणांत खोडया काढतो. बाहेर व्यवस्थित सुंदर पोषाख करून हिंडणारा माणूस घरांत अजागळाप्रमाणें पंचा नेसून कसा तरी आडवा पडलेला असतो. एकंदरींत माणूस घरांत आल्याबरोबर आपला दर्जा आणि योग्यता विसरून जातो; असंस्कृत, अडाणी व रानटी बनतो.

घरामुळें माणसाची जरा तरी उन्नति झाली आहे का? उलट अवनतीच झालेली दिसून येते. घरामुळें माणूस घरकोंबडा व आळशी बनतो. बाहेर खूप उद्योग व परिश्रम करणारा माणूस घरांत झोंपा काढतो, पत्ते खेळतो किंवा चकाटया पिटीत बसतो! मूर्खपणाचें लेखनही करतो! म्हणजे, माणूस आपल्या बहुमोल वेळेचा दुरुपयोग करतो!

घरांत आल्यावर माणूस किती क्षुद्र पातळीवर येतो तें पाहा! बाहेर राजकारणाच्या गहन उलाढाली करणारा माणूस घरांत कांदेबटाट्याचा आणि मीठमिर्चीचा हिशेब करीत बसतो. इंग्रजांचें पारिपत्य कसें करावें, या गंभीर विचारांत असलेला माणूस घरांत आल्याबरोबर तेथल्या उंदरांचें आणि ढेकणांचें पारिपत्य कसें करावें, हा विचार करतो! घरांत

आल्याबरोबर माणूस जगाला विसरतो आणि त्याची दृष्टि संकुचित व क्षुद्र बनते !

कित्येक फॅशनेबल स्त्रिया बाहेर सुंदर दिसतात. पण घरांत कुरूप दिसतात. हा त्यांचा दोष नाहीं, घराचा दोष आहे !

असें असूनही घर ही संस्था मोठ्या मान्यतेला पावली आहे. घराचा बडेजाव फारच होत आहे आणि घरदार असलेला माणूस समाजांत प्रतिष्ठित व संभावित समजला जात आहे ! समाजाची ही समजूत अशीच असणें हितावह आहे ! कारण, अज्ञानांतच सुख असतें, नाहीं का ?

## स्पष्टवक्तेपणा !

## १२

स्पष्टवक्तेपणा हा एक फार मोठा गुण समजला जातो. जगांत स्पष्ट बोलणारे लोक फार थोडे असतात. एखाद्या माणसाविषयींचें आपलें खरें मत, त्या माणसाच्या तोंडावर बोलून दाखविण्यास बरेच लोक तयार नसतात. एखाद्याच्या तोंडावर स्पष्ट बोलण्यास कांहीं जणांना भीति वाटते, कांहीं जणांना संकोच वाटतो, आणि कांहीं जणांच्या स्वभावांतच तें नसतें.

ज्यांच्या अंगीं स्पष्टवक्तेपणा आहे, तो स्वतःला मोठा प्रामाणिक, निर्भय व शूर समजत असतो. कुणाचाही भीडमुलाजा न बाळगतां, स्पष्ट बोलण्याचें

मनोधैर्य आपल्यामध्यें आहे, या घमेंडींत तो जगाकडे तुच्छतेनें पाहत असतो ! आपल्या स्पष्टवक्तेपणामुळें, सारे लोक आपल्याला वचकून असतात, असाही एक आसुरी आनंद त्याच्या मनाला वाटत असतो.

स्पष्टवक्तेपणाचा बडेजाव कोणी कितीही मिरवोत, पण मला मात्र हा कांहीं चांगला गुण वाटत नाहीं. उलट स्पष्टवक्तेपणा, हा व्यवहाराला मारक आणि शिष्टाचाराला बाधक असा एक दुर्गुण आहे, असें माझें मत आहे. स्पष्टवक्ता माणूस हा जगांत नेहमी अप्रिय असतो. कारण आपल्या सडेतोड बोलण्यानें तो इतरांच्या भावना दुखवीत असतो ! तेव्हां हा नसता उद्योग करा कशाला ? गाढवाला गाढव म्हटल्यानें जर त्याला राग येत असेल, किंवा त्याच्या भावना दुखत असतील तर त्या बिचाऱ्या प्राण्याला गाढव म्हणून कां हिणवावें ?

अत्यंत व्यवहारशून्य माणूसच स्पष्टवक्ता होत असतो. ज्याला व्यवहार साधायचा आहे आणि चार लोकांचीं मनें संभाळायचीं आहेत, त्याला स्पष्टवक्ता होऊन भागणारच नाहीं.

काल रात्रींच पाहा ! मी एका संगीत बैठकीला गेलों होतों. गाणाऱ्या बाईचा आवाज चांगला नव्हता. एकंदर संगीत बेसूर आणि कर्कशच होतें. पण गाणें संपल्यावर जेव्हां त्या बाईनें मला विचारलें ' कसं काय झालं माझं गाणं ? ' तेव्हां मीं मान डोलवीत ठांसून उत्तर दिलें कीं, ' वा ! छान ! फार दिवसांत अशी सुंदर चीज ऐकावयास मिळाली नव्हती ! '

माझ्या या उत्तरानें ती बाई इतकी खूष झाली कीं, ताबडतोब माझ्या पुढयांत मसाल्याचें दूध आणि पानाचा विडा येऊन पडला ! मी जर स्पष्टवक्ता बनलों असतों, तर माझा असा आदरसत्कार झाला असता का ?

आज सकाळींच एक कवि माझ्या दारांत येऊन काव्यगायन करूं लागला ! मला त्या कवितेंतला कांहीं अर्थ कळला नाहीं.. म्हणून का मी माझें स्पष्ट मत सांगून टाकून, त्या कवीच्या प्रतिभेचा गळा दाबूं ? उलट, मी त्या कवीची पाठ थोपटली आणि अशाच कविता खूप लिहीत चला, म्हणून जोरदार शिफारस केली ! मीं मनांत म्हटलें, लेकाचा मरेना भिकार कविता खरडून ! रिकामटेकडया माणसानं

दुसरं तरी काय करावं? आपलं काय जात आहे त्यांत? उगाच माझं स्पष्ट मत व्यक्त करून, त्या कवीला कां चिडवा! आणि जगांत एक शत्रु कां निर्माण करून ठेवा?

माझ्या ओळखीचा एक मुखशूर पण भ्याड माणूस आहे. पराक्रमाच्या आणि वीरश्रीच्या बाता तो नेहमी झोंकीत असतो. पण गांवांत दंगा किंवा एखादी चळवळ चालू असली कीं हा माणूस दरवाजा बंद करून बसतो! पण यासंबंधीं त्याला मी कधींही हिणवीत नाहीं. उलट, त्याच्या भ्याडपणाला 'मुत्सद्दे-गिरी' 'धूर्तपणा' असें गोंडस नांव देऊन मी त्याचा गौरव करीत असतों. 'अविचारानें तूं भलत्या चळवळींत पडत नाहींस, वेळ आली म्हणजे पराक्रम करून दाखविण्यासाठीं तूं आपली शक्ति राखून ठेवली आहेस' असें जेव्हां मी बोलून दाखवितों, तेव्हां त्याला मूठभर मांस चढतें आणि चहा-चिवडा देऊन तो मला संतुष्ट करतो! त्याच्याजवळ मीं माझ्या स्पष्टवक्तेपणाचें प्रदर्शन केलें असतें तर शिरमिंदा होऊन, तो माझा सहवास टाळूं लागला असता, आणि त्याच्या वाचाळतेनें लाभणाऱ्या करमणुकीला मी मुकलों असतों.

माझ्या शेजारचा एक गृहस्थ अतिशय खादाड आहे. पण तसें स्पष्ट बोलून मी त्याच्या खादाडपणावर कां टीका करूं? माझें थोडेंच खातो तो! उलट, 'तुमची पचनशक्ति किती दांडगी आहे हो! आजकालच्या तरुणांना दोन पोळयाही पचवितां येत नाहींत!' असें म्हणून मी त्याचें कौतुक करतो! याचा परिणाम असा होतो कीं तो गृहस्थ कधीं कधीं आपल्या पंक्तीला मलाही घेऊन बसतो!

माझी एक मैत्रीण जरा अशीतशीच आहे. रस्त्यानें चालतांना ती खूप नखरा करते आणि पदराचं तर तिला भानच राहत नाहीं. म्हणून तिच्यावर मी निर्लज्जपणाचा आरोप कधींही करीत नाहीं! उलट मी तिची तारीफ करतों, 'अहाहा! किती मोकळ्या मनाची अल्लड बालिका! मनांत कसलंहि पाप नाहीं! कशी तरी चालते, कशी तरी बोलते, कशी तरी हंसते!'

माझे हे उद्गार ढोंगी आहेत यांत शंका नाहीं. पण स्पष्टवक्तेपणा गाजवून तिच्या भावना कां दुखवा! तिचा पदर जरा खांद्यावरून ढळला म्हणून राष्ट्राचें असें काय फार मोठें अकल्याण होणार आहे?

म्हणजे माणसानें आपलें स्पष्ट मत दाबून ठेवून ढोंगीपणाचें वर्तन ठेवावें काय ? खोटी स्तुति आणि हांजी हांजी करीत सुटावें काय ? मी तसा कधींच आग्रह धरीत नाहीं. समाजकंटकांचा दंभस्फोट करण्यासाठीं स्पष्टवक्तेपणा जरूर असावा ! स्वार्थसाधु लोकांची कारवाई वेशीवर टांगण्यासाठीं स्पष्टवक्तेपणाचा जरूर अवलंब करावा. पण उठल्या सुटल्या प्रत्येक व्यक्तीचा दोष दाखवीत सुटणें, लहान सहान व्यक्तीच्या हळव्या भावनांना चिमटा घेत बसणें, हा कांहीं चांगला उद्योग नाहीं !

## शिष्टाचार

## १३

दारांत आलेल्या माणसाला ‘ या बसा ’ म्हणून आपण त्याचें स्वागत करतों. हा एक सर्वसामान्य शिष्टाचार आहे. पण दारांत येणारा प्रत्येक माणूस हा स्वागतार्ह असतोच असें नाहीं ! कांहीं माणसें आपल्याला नको असतात, कांहीं माणसें दारांत पाऊल ठेवण्याच्या लायकीचीं नसतात ! कांहीं रिकामटेकडे लोक आपला वेळ आणि चहा घेण्यासाठीं आलेले असतात ! तरी पण त्या सर्वांना आपण मोठ्या सौजन्यानें ‘ या बसा ! ’ म्हणतों. इतकेंच नव्हे, तर ‘ वा ! तुम्हाला पाहून फार आनंद झाला ! ’ ‘ चहा घेता का काफी ? ’ ‘ प्रकृति ठीक आहे ना ? ’ वगैरे

फाजील कळकळ दाखवून व अनेक प्रकारच्या बतावण्या करून आपण त्या माणसांना घालवून देतों !

शिष्टाचार म्हणजेच ढोंगबाजी ! एका माणसानें दुसऱ्या माणसाजवळ जें कांहीं खोटें नाटक करावयाचें असतें त्यालाच शिष्टाचार म्हणतात.

'थँक यू !' 'सॉरी' 'माफ करा' इत्यादि शब्दप्रयोगही शिष्टाचाराचे स्वस्त नमुने होत ! गर्दीत एखाद्या बाईला धक्का लागला तर 'माफ करा' म्हणणें एक वेळ शोभून दिसेल. पण लाचारपणें हात पुढें करून उभा असलेल्या भिकाऱ्याला 'माफ करा' म्हणण्यांत प्रयोजन काय ? त्याला सरळ 'पुढें जा' म्हणून कां सांगत नाहीं ? 'माफ करा' म्हटल्यानें भिकाऱ्याची निराशा कमी प्रमाणांत होते आणि 'पुढें जा' म्हटल्यानें निराशा तीव्र होते ? पण शिष्टाचाराचे गोंडस शब्द वापरून आपण किती चांगुलपणानें भिकाऱ्याची हकालपट्टी करतों !

'थँक यू' या शब्दप्रयोगाला तर धरबंधच उरला नाहीं. विडी शिलगावयाला कोणी काडी दिली तरी आपण 'थँक यू' म्हणून ऋणांतून मुक्त होतो !

क्षुल्लक कारणासाठींही आभारप्रदर्शनाचें ढोंग किती करावें लागतें आपल्याला !

एकंदरींत शिष्टाचाराच्या या उपाधीमुळें माणसाची मोठी कुचंबणा होते यांत शंका नाहीं. मनांत नसतांना कित्येक नखरे आपल्याला करावे लागतात, नाटकी भाषा बोलावी लागते, हास्यास्पद अभिनय करावे लागतात ! ढोंगाची आणि सोंगाची बतावणी करून वेळ मारून न्यावी लागते !

आणि रस्त्यांत ओळखीचा माणूस भेटला तर त्याच्याकडे दुर्लक्ष करून तुम्हाला पुढें जाण्याची सोय आहे का ? शिष्टाचार-पालनासाठीं तुम्हाला कांहीं रंगढंग करावे लागणारच ! नमस्कार, सलाम किंवा निदान मान वांकडी करून मूक अभिवादन ! कांहीं-तरी तुम्हाला करावें लागणारच ! असें कांहीं केल्याशिवाय जर तुम्ही पुढें जाल तर अशिष्ट, जंगली, किंवा उर्मट, मिजासखोर, म्हणून तुमची गणना होईल ! परस्परांच्या प्रेमापेक्षां परस्परांच्या भीतीनेंच आपण कसे तत्परतेनें शिष्टाचार पाळतों !

एखादा माणूस आजारी पडला तर त्याला भेटाव-यास बरेच जण जात असतात. अर्थात् सारे जण गंभीर चेहरा करून प्रकृतीची चोकशी करीत

असतात. या सर्वांना त्या आजारी माणसाविषयीं फार चिंता लागून राहिलेली असते, अशांतला भाग नाहीं! कांहीं जणांना खरोखर कळकळ असेल, पण कांहीं जण केवळ औपचारिक भेट देण्यासाठींच आलेले असतात! आजारी माणसाला भेटणें हा एक शिष्टाचार आहे एवढेंच त्यांना माहित! अशा ढोंगी माणसांच्या गर्दीमुळें आजारी माणसाला विश्रांति मिळण्याऐवजीं उपद्रवच होतो! आणि ढोंगी लोकांचा बहुमोल वेळही शिष्टाचार दाखविण्यामध्यें विनाकारण खर्च होतो!

माणसानें शिष्टाचार पाळू नयेत असें मी म्हणत नाहीं. उलट, आजच्या सुसंकृत युगांत शिष्टाचाराशिवाय माणूस शोभत नाहीं. पण शिाचष्टार हा माणसाच्या सत्प्रवृत्तींतून जन्माला आला पाहिजे. लबाडींतून नव्हे!

## उपदेश

## १४

'गोड फार खाऊं नये, खोटें कधीं बोलूं नये' अशा प्रकारचा उपदेश शाळेंतल्या मुलांना पंतोजी करीत असतात. हीं मुलं मोठीं झाली म्हणजे देशांतले पुढारी त्यांना वेगवेगळा उपदेश करतात! आजकाल हिंदुस्थानांत जिकडे तिकडे उपदेशाच ऐकूं येतो! 'शांत राहा!' 'अहिंसा पाळा!' 'सत्य बोला!' 'शेजाऱ्यावर प्रेम करा!' अशा प्रकारच्या उपदेशानें वातावरण गजबजलेलें दिसून येतें! हिंदी लोकांना हिंदी पुढारी जितका उपदेश करतात, तितका जगांत कुठल्याही राष्ट्रांतल्या लोकांना तेथले पुढारी करीत नसतील!

अरेरे ! हिंदुस्थानच्या लोकांना कांहींच अक्कल नाहीं ? स्वतःचें बरेंवाईट त्यांना कळत नाहीं का ? त्यांना स्वतंत्र विचारशक्ति नाहीं का ? लहान मुलांना ‘ बाळया, खोड्या करूं नकोस ’ असा प देश करतात, तसा या पुढाऱ्यांनीं आम्हाला एकसारखा उपदेश करीत सुटावें याचा अर्थ काय ? आमचे केंस पिकले, आम्ही चार मुलांचे बाप झालों, तरी पुढारी आम्हाला मामुली उपदेश करतात कीं, ‘ शांत रहा ! सत्य बोला ! ’ ‘ खादी वापरा ! ’ ‘ दारू पिऊं नका ! ’ ‘ दोन लग्नें करूं नका ! ’

अरेरे ! आम्हाला कांहींच व्यवहारज्ञान नाहीं काय ? आम्ही अगदींच लहान मुलं आहोंत काय ? अगदीं मामुली उपदेशही पुढाऱ्यांनीं आम्हाला करावा एवढे आम्ही मूर्ख आहोंत काय ? जगांतल्या इतर देशांतही पुढारी जनतेला असाच पोरकट उपदेश करीत असतात का ?

उपदेश, उपदेश आणि उपदेश ! या उपदेशानें कान अगदीं किटून गेले आहेत. पुढाऱ्यांचीं पत्रकें वाचून वाचून डोळ्यांपुढें अंधेरी आली आहे.

हिंदुस्थानांत जो पुढारी उठतो, तो उपदेशाच करीत सुटतो. त्याला वाटतें, आपण तेवढे शहाणे,

आणि जनता मूर्ख ! किंवा याहून दुसरा मोठा उद्योग नसल्यामुळें ते तरी काय करणार ?

बरें, एक उपदेश एकाच वेळीं करून हे पुढारी गप्प बसतात काय ? तोच तो उपदेश हजार वेळां करून जनतेमध्यें जागृति निर्माण करण्याचें कार्य अखंड चालू असतें. आपले लोक विसरभोळे फार ! त्यामुळें कालचा उपदेश आज आणि आजचा उपदेश उद्यां, अशी उजळणी केल्याशिवाय आपल्या मठ्ठ डोक्यांत प्रकाश कसा पडणार ?

'शांत रहा !' हा उपदेश इतक्या वेळां झाला, कीं प्रत्येक शांततापत्रकाबरोबर दंगा वाढतच गेला ! दंगा करून करून गुंड थकले ! पण शांततापत्रक काढणारे पुढारी थकले नाहींत ! 'सत्य बोला !' या उपदेशाबरोबर काळा बाजार आणि लांचलुचपत यांचा जोरानें फैलाव झाला ! 'दारू पिऊं नका !' या उपदेशाबरोबर दारूचा चोरटा व्यापार भरभराटीस आला ! 'शेजाऱ्यावर प्रेम करा !' या उपदेशाचा अर्थ शेजाऱ्याची मुलगी पळविण्यांत होऊं लागला !

आज हिंदी पुढारी आणि हिंदी जनता यांचे संबंध, पंतोजी आणि शाळकरी मुलें, अशा स्वरूपाचे झाले आहेत ! पंतोजी हातांत छडी घेऊन मुलांना

उपदेश करीत असतात, त्याप्रमाणें हे पुढारी हातांत पत्रकं घेऊन आम्हाला उपदेश करीत असतात.

उपदेश हा अज्ञानी व मूढ जनांना करावयाचा असतो! एखाद्या गोष्टीचा दुष्परिणाम ज्यांना कळत नाहीं, अशा माणसांना उपदेश करावयाचा असतो. पण सत्य बोलल्यानं काय मोक्ष मिळतो, दारू प्याल्यानं काय दुष्परिणाम होतात, आणि अहिंसा पाळल्यानं स्वातंत्र्य कसं मिळतं, हें हिंदुस्थानच्या चाळीस कोटी लोकांना माहित असतांना त्यांच्या घश्यांत उपदेशाचा डोस कोंबावा, ही केवढी हास्यास्पद गोष्ट आहे! आमचे पुढारी आम्हाला बेवकूफ समजतात, हा हिंदी जनतेचा अपमान नाहीं काय?

## चित्रपटांचे फायदे १८

आजकाल साऱ्याच जणांना चित्रपटाचें मोठें वेड लागलें आहे. करमणुकीचें एक फार मोठें साधन म्हणून चित्रपटांचें महत्त्व वाढत आहे. थोरांना आणि पोरांना, श्रीमंतांना आणि गरिबांना, स्त्रियांना आणि पुरुषांना चित्रपटांचें दांडगेंच आकर्षण आहे. चित्रपटांची लोकप्रियता अनन्यसाधारण आहे, यांत शंकाच नाहीं.

अशा या चित्रपटांचा माझ्या जीवनावर काय परिणाम झाला तेंच मी आतां सांगतों. 'परमेश्वरा, तुला मी कुठें धुंडूं ?' अशी मला चिंता पडली होती. परमेश्वराच्या शोधासाठीं काशी, हरिद्वार, प्रयाग वगैरे तीर्थयात्रा मीं केल्या ! हिमालयाच्या आसपास वणवण

फिरलों ! व्रतें, वैकल्यें आणि उपोषणें खूप केलीं ! गोसावी, बैरागी, यांच्या मागें लागलों. पण परमेश्वर कांहीं मला भेटला नाहीं. शेवटीं एक दिवस एक सिनेमा पाहण्यासाठीं गेलों आणि काय आश्चर्य ! मला परमेश्वर भेटला !

ज्या परमेश्वराचें दर्शन साधुसंतानाही दुर्मिळ, ज्याच्यासाठीं मोठमोठे ऋषि आणि महर्षि घोर अरण्यांत तपश्चर्या करतात, तो परमेश्वर मला सिनेमा थिएटरांत पांच आण्याच्या तिकिटांत भेटला ! शंख, चक्र, गदा, पद्म, धारण केलेला भगवंत एका तेजोवलयांतून रुपेरी पडद्यावर प्रगट झाला आणि त्याबरोबर प्रेक्षकांनीं टाळ्या आणि शिट्या वाजवून थिएटर दणाणून सोडलें ! मींही जोरांत टाळ्या वाजवून भगवंताचें स्वागत केलें ! अहाहा ! काय तें दिव्य दर्शन ! काय तें भगवंताचें स्वर्गीय हास्य ! काय तें बोलणें आणि चालणें ! असा चालता, बोलता, नाचता, गाता परमेश्वर माझ्या डोळ्यांना दिसावा, हें माझें केवढें भाग्य !

स्वर्गात परमेश्वर कसा असेल याची अंधुक कल्पना मला छापील चित्रांवरून आणि देवळांतल्या मूर्तीं-

वरून होती. पण तो बोलतो कसा, चालतो कसा, हें मात्र मला बिलकूल माहित नव्हतें. पण रुपेरी पडद्यामुळें परमेश्वराचें जिवंत दर्शन मला घडून आलें आणि त्याच्या सर्व हालचाली कळून आल्या ! गोपींबरोबर रासक्रीडा करणारा कृष्ण-कन्हय्या, राधेच्या घरांतील लोणी चोरून खाणारा गोकुळचा चोर, वनांत धेनु हांकीत बन्सी वाज-विणारा गोपालकृष्ण, इत्यादि भगवंताच्या गोड लीला प्रत्यक्ष पाहावयास मिळून माझ्या डोळयांचें सार्थक झालें ! अहाहा ! सिनेमानं केवढे उपकार केले माझ्यावर ! घोर अरण्यांत तपश्चर्या नको, तीर्थयात्रा नको, व्रतें-उपवास नकोत, भजन-कीर्तन नको, फक्त दोन तास रांगेंत राहून सिनेमाचें एक तिकीट काढलं कीं हटकून परमेश्वरप्राप्ति ! माझ्यासारख्या श्रद्धाळू भाविकाला चित्रपटापासून केवढा फायदा हा !

चित्रपटानें मला परमेश्वरप्राप्ति करून दिली, तशीच प्रेयसीची प्राप्ति करून दिली आहे. प्रेम कसें करावें, हें चित्रपटानेंच मला शिकविलें. प्रियाराध-नेच्या बाबतींत अगदींच अजाण असलेला मी चित्रपट पाहून, इष्काचे डाव खेळण्यांत तरबेज झालों. नदी-किनारीं आपल्या आवडत्या सुंदरीला एकांतांत गांठून

अंतःकरण उघडें कसें करावें, आणि मग तिनें एक मुरका मारतांच द्वंद्वगीताला कशी सुरुवात करावी, आणि मग आमच्या मीलनांत अडथळा आणणाऱ्या खलपुरुषाला ठोसा कसा मारावा, हे धडे चित्रपटापासूनच मीं पैदा केले !

चित्रपटानें माझा आणखीही एक फार मोठा फायदा करून दिला आहे. माझा निद्रानाशाचा रोग चित्रपटानेंच नाहींसा केला. झोंप येत नसली म्हणजे गांवांतले कंटाळवाणे चित्रपट मी पाहण्यास जातों आणि थिएटरांत स्वस्थ घोरत पडतों !

चित्रपटानें समाजावर इष्ट किंवा अनिष्ट परिणाम काय होत असेल तो होवो. पण माझ्या बाबतींत मात्र त्याचा असा परिणाम झाला आहे.

# जाहिरातींचे उपकार



माझ्या हातांत वर्तमानपत्र पडलें कीं, त्यांतल्या जाहिराती मीं प्रथम आस्थेनें वाचीत असतों. संपादकांच्या अग्रलेखापेक्षां, वर्तमानपत्रांतल्या जाहिरातीमुळेंच मानवाच्या ज्ञानांत भर पडत आहे, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. संसारांतलीं दु:खें आणि माणसांचीं दुखणीं निवारण होण्यास जाहिरातींचा फार उपयोग होतो यांत शंका नाहीं. वर्तमानपत्रांतल्या जाहिरातींनीं मानवी जीवनावर फार मोठे उपकार केले आहेत.

जाहिरातींच्या वाचनानें उत्साह, आनंद आणि आत्मविश्वास निर्माण होतो. निसर्गाशीं, काळाशीं,

अधिव्याधींशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य जाहिरातींच्या वाचनानें प्राप्त होतें. वयपरत्वें माणूस म्हातारा बनतो, पण म्हातारपणींही तारुण्यप्राप्ति कशी करून घ्यावी, याची गुरुकिल्ली जाहिरातींत असल्यामुळें, माणूस वार्धक्याला डरत नाहीं ! कोणत्या रोगावर कोणती बाटली घ्यावी, कोणत्या व्याधीला कोणती गोळी घ्यावी, याचें विलक्षण ज्ञान जाहिरातींच्या वाचनानें ज्याला प्राप्त झालें आहे तो काय कधीं आजारी पडणार कीं म्हातारा होणार !

पांढरे केंस काळे कसे करावेत, फुटका कान दुरुस्त कसा करावा, आणि टक्कल पडलेलें डोकें पुन्हां केंसाळ कसें करावें, याची अद्भुत माहिती जाहिरातीशिवाय आपणांस झाली असती काय ? लठ्ठ स्त्रीला सडपातळ बनविणारा चमत्कार, आणि काडीपेहेलवानाला बलभीम बनविणारें टॉनिक जाहिरातींमध्येंच आपणांस सांपडतें, नाहीं का ? दमा, श्वास, खोकला, कमजोरी, कटिशूळ, मस्तकशूळ इत्यादि हजारों दुर्धर व्याधींवर रामबाण इलाज आपणांस जाहिरातींतच आढळून येतो, नाहीं का ? शिवाय यंत्र, मंत्र, ताईत, हिमालयांतील जडीबुट्टी इत्यादि दैवी चमत्कारही संकटग्रस्त मानवाचे क्लेश

निवारण करण्यासाठीं कसे तत्पर असतात, हें जाहिरातीमध्येंच दिसून येऊन, मनाला किती धीर येतो ! एका इंचाच्या जाहिरातींत सहा फूट उंचीच्या माणसाला जीवदान देण्याचें सामर्थ्य असतें, ही केवढी अद्‌भुतरम्य गोष्ट !

थोर पुढारी जसे राष्ट्राला संदेश देतात, तसे जाहिरातीही माणसाला धीराचा आणि स्फूर्तीचा संदेश देत असतात. 'आतां निराश होण्याचें कारण नाहीं !' 'तीन दिवसांत हटकून गुण' 'दांत उपटून घेऊं नका !' 'तीन वर्षांत मॅट्रिक व्हा !' 'आमचे घोडे खेळून गेलेले पैसे परत मिळवा' इत्यादि जाहिरातींतले संदेश वाचले म्हणजे निराश मनाला केवढा धीर आणि आत्मविश्वास वाटूं लागतो !

सिनेमाशोकिनांवर तर जाहिरातींचे फारच मोठे उपकार आहेत. आज कोणता सिनेमा पहावा, ही विवंचना करीत बसण्याचें कारण उरत नाहीं. तिकिटांच्या अभावीं शेंकडों लोक परत गेल्याची बातमी आपण जाहिरातींत वाचतों आणि आपणही निराश होऊन परत जाण्यासाठीं त्या थिएटरकडे धांव घेतों. पंचविसाव्या आठवड्यांतही 'हाउस फुल्ल' थिएटर कोणतें आहे, हें जाहिरातीमुळेंच आपणांस

कळून येतें आणि मग आपणही तें थिएटर रिकामें असलें तरी, 'हाउस फुल्ल' करण्यासाठीं धांवून जातों.

अनेक अज्ञात रहस्यमय गोष्टींचें ज्ञान जाहिराती-मुळेंच आपणांस प्राप्त होतें. कोणता साबण वापर-ल्यानें आपली त्वचा मृदु आणि चमकदार बनते, कोणती विमा कंपनी किफायतशीर आहे, कोणत्या बँकेंत पैसे सुरक्षित राहतात, कोणत्या मसाल्यानें स्वैंपाक रुचकर बनतो, कोणत्या औषधानें ढेंकूण आणि झुरळांचा नाश होतो, कोणता शिंपी रुबाबदार कपडे शिवून देतो, कोणता फोटोग्राफर आपला फोटो सुंदर काढून देतो इत्यादि गोष्टींचें ज्ञान जाहिराती-शिवाय आपणांस कधींच झालें नसतें ! हिंवाळ्यांत कोणता शक्तिवर्धक पाक खावा, पावसाळ्यांत कोणती छत्री वापरावी आणि उन्हाळ्यांत कोणतें थंडगार पेय प्यावें, याही गोष्टींचें ज्ञान जाहिरातीशिवाय आपणांस झालें नसतें ! म्हणूनच मी म्हणतों, कीं जाहिरात म्हणजे परोपकारी मित्र आहे. मानवी जीवन सुखमय करण्याची महत्त्वाची कामगिरी वर्तमानपत्रांतल्या जाहिराती करीत असतात.

रात्रीं झोंपी गेलेला माणूस पहांटे कशामुळें जागा होतो ? कशामुळें तो खडबडून, दचकून उठतो ? नळावरल्या भांडणामुळेंच नाहीं का ? पहांटेच्या शांत वातावरणांत मुंबईत फार मोठा गोंगाट आणि गलबला कशामुळें होतो ? नळामुळेंच नाहीं का ! बादल्यावर बादल्या, कळशीवर कळशी आपटून जे भयंकर स्फोट होतात, ते नळावरच नाहीं काय ?

मुंबईसारख्या शहरांत घरोघरीं पाणी पुरविणारा नळ, हा सकाळ-संध्याकाळ लाखों लोकांचा चर्चेचा विषय होऊन बसला आहे. गल्लीगल्लींत आणि चाळी-चाळींत नळासाठीं फार मोठी धांवपळ आणि आरडा-

ओरड चालू असते. नळावरचीं भांडणें हीं तर प्रसिद्ध आहेत. नळ कधीं चालू होतो, याची लोक मोठ्या उत्कंठेनें वाट पाहतात आणि तो चालू झाल्यावर अत्यंत हांवरेपणानें त्याच्यावर तुटून पडतात ! नळ बंद झाला कीं हताश होऊन लोक म्युनिसिपालिटीला व घरवाल्याला शिव्या देतात. स्त्रियांचा आणि नळाचा विशेष संबंध असल्यामुळें, सर्वांपेक्षां त्यांचीच ओरड जास्त नळावर होत असते.

वास्तविक गल्लींतला नळ हा समुद्राच्या मानानें किती लहान आणि त्याचा प्रवाह किती क्षुद्र ! असें असूनही समुद्रापेक्षां नळाचाच बडेजाव जिकडेतिकडे चाललेला पाहून त्या विशाल सागराला काय बरें वाटत असेल ! तो दुर्दैवी महासागर किनाऱ्यावरच्या दगडावर डोकें आपटून शोक करीत असेल, ' अरेरे ! मी इथें एवढा अफाट पसरलों आहें, तरी माझ्याकडे कोणी ढुंकूनही पाहत नाहीं ! आणि तिकडे गल्लीं-तल्या इवल्याशा नळाभोंवतीं सारेच जण मनधरणी करीत आहेत. चोवीस तास विपुल पाणी पुरविण्याचें सामर्थ्य असलेल्या या अथांग सागराकडे एक लहा-नशी कळशी घेऊनही कोणी येत नाहीं ! आणि तिकडे अंधाऱ्या गल्लींत थेंब थेंब झिरपणाऱ्या अर्धवट

नळाभोंवतीं हजारों स्त्रिया पिंगा घालीत आहेत ! काय ही क्षुद्र नळाची लोकप्रियता आणि कोण ही विशाल समुद्राची अवहेलना ! ' अशा प्रकारचा दारुण शोक करीत तो दुर्दैवी सागर किनाऱ्यावरच्या दगडधोंड्या-वर अहोरात्र डोकें आपटून आक्रंदन करीत असतो ! पण मुंबईच्या लाखों स्त्रीपुरुषांना त्याची कदर नाहीं ! ते नळाचीच मोठ्या आतुरतेनें वाट पाहत असतात !

## मानवाचा शत्रु कोण ? १८

रामराव आपलें घर सोडून पळून निघून गेले ! कां तर म्हणे त्यांच्या घरांत प्लेगचा उंदीर आढळून आला.

—आणि हे शामराव ! सकाळपासून कोकलत किंचाळत आहेत ! कां तर म्हणे त्यांना विंचू चावला !

—आणि त्या तांबटगांवचे शेतकरी फार फार हवालदील झाले आहेत ! कां तर म्हणे वाघाचा उपद्रव ! काल तर पाटलांची कोंबडीच वाघानें पळविली !

अरेरे ! माणसाला हे दुष्ट प्राणी सुखासमाधानानें नांदूं देत नाहींत ! यांना म्हणतात माणसाचे शत्रु !

या भूतलावर जन्म घेणाऱ्या सर्व प्राणिमात्रामध्यें मानवप्राणी हा श्रेष्ठ समजला जातो. पण मानव हा कितीही श्रेष्ठ असला, तरी इतर कांहीं प्राण्यांना तो भीत असतो. मानवाचें बुद्धिबल आणि शरीरबल कांहीं कांहीं प्राण्यांपुढें पंगु ठरतात. अत्यंत क्षुद्र असा कीटकही बलाढ्य मानवाचा प्राण घेऊं शकतो. प्लेगचा उंदीर किंवा मलेरियाचा जंतु मानवाचा अहंकार एका एका क्षणांत जमीनदोस्त करूं शकतो !

मानवाला या जगांत जसे कांहीं मित्र आहेत, तसे शत्रूही आहेत. गाय, म्हैस, रेडा, बैल, कुत्रा, घोडा, इत्यादि पशुकोटींतले कांहीं परोपकारी प्राणी मानवाचे मित्र म्हणून धन्यवादास पात्र झाले आहेत. तर वाघ, सिंह, साप, विंचू, उंदीर इत्यादि घातपाती आणि उपद्रवी प्राण्यांना आपल्या जवळपास थारा देण्यास माणूस तयार नाहीं ! अशा प्राण्यांची गणना शत्रु-पक्षांतच केली जाते !

वाघ म्हटला कीं माणूस घाबरतो, साप म्हटला कीं किंचाळतो, विंचवाची नांगी ठेंचण्यास तयार होतो, उंदराविरुद्ध मोहीम सुरू करतो ! माणसाला या प्राण्यांची किती दहशत वाटत असते ! वाघावर बंदुकीची गोळी झाडण्यासाठीं आणि सापावर सोटा

उगारण्यासाठीं माणूस केवढ्या हिरीरीनें धांवून जातो ! माणसाच्या मनांत या प्राण्यांबद्दल केवढी भयंकर वैरभावना असते ! माणसाच्या सुरक्षिततेला हे प्राणी धोका निर्माण करीत आहेत, म्हणूनच त्यांचा नायनाट करण्यासाठीं माणूस एवढी धडपड करीत असतो !

पण खरोखरच, वाघ, साप, विंचू , उंदीर मच्छर, ढेंकूण हे प्राणी माणसाचे इतके भयंकर शत्रु आहेत काय ? वाघानें कांहीं माणसांना खाल्लें असेल, सापानें कांहीं माणसांना चावलें असेल, उंदरांनीं कांहीं ठिकाणीं प्लेग निर्माण केला असेल, मच्छरानें मलेरिया पाठवला असेल, ढेंकणांनीं माणसाचें थोडेंबहुत रक्त-शोषण केलें असेल, म्हणून हेच तेवढे माणसाचे शत्रु ठरावेत काय ? माणसाची याहून भयंकर हानि करणारे प्राणी जगांत दुसरे नाहींत काय ?

रानांतल्या वाघानें, रस्त्यावरच्या सापानें, प्लेगच्या उंदरानें किंवा रोगाच्या जंतूनें मानवाचा जेवढा नाश केला नसेल, तेवढा दुसऱ्याच एका प्राण्यानें केला आहे ! आणि तो प्राणी म्हणजे मानवच ! मानवाचा खरा भयंकर दुष्मन मानवच आहे ! मानवानें मानवाची जितकी हत्त्या केली, मानवानें मानवाची जितकी

विटंबना केली आणि मानवानें मानवाचा जितका सर्वनाश केला, तितका दुसऱ्या कोणत्याच प्राण्यानें केला नाहीं !

महायुद्धांत लाखों मानवांचा संहार कोणी केला? बॉंबवर्षावानें नागरिकांची दाणादाण कोणी उडविली? आणि आज हिंदुस्थानांत जातीय दंगलीचा महाभयानक वडवानल कोणीं पेटविला? स्त्री-पुरुषांची क्रूर कत्तल, घरादारांची जाळपोळ, निर्वासितांची पळापळ या सर्व अनर्थांना कारण कोण? गुंडगिरीचें राक्षसी प्रदर्शन करून आणि पाशवी अत्याचारांची पराकाष्ठा करून मानवांनींच मानवांची किती क्रूर विटंबना केली आहे ! यावरून मानव हाच मानवाचा महाभयंकर शत्रु आहे हें सिद्ध होत नाहीं काय?

महायुद्धांतला संहार आणि गुंडगिरीचें थैमान सोडून दिलें, तरी इतर साळसूद उपायांनीं एक मानव दुसऱ्या मानवाचा कसा गळा कापीत आहे! काळा बाजार, नफेबाजी, लांचलुचपत, इत्यादि प्रकार म्हणजे मानवानें मानवाच्याच मानेवर ठेवलेला सुरा नाहीं काय? आणि मजुरांचें रक्तशोषण करणारी भांडवलशाही अरेरावी यांच्यापुढें ढेकूण काय रक्तशोषण करतो?

मानवानें मानवाचीच चालवलेली पिळणूक, मानवानें मानवाचीच चालविलेली विटंबना, मानवानें मानवांचाच चालविलेला क्रूर संहार, इत्यादि अनर्थ पाहिले, म्हणजे या जगांत मानव हाच मानवाचा सर्वांत मोठा शत्रु आहे, असें वाटूं लागतें !

## क्षणाचे मित्र



माणूस आपल्या गुणानें किंवा दुर्गुणानें आपल्याभोंवतीं कांहीं मित्रपरिवार निर्माण करतो. समान शील किंवा समान व्यसन हें मैत्रीचें प्रमुख कारण म्हणतां येईल. जिवाभावाचा मित्र लाभणें हें एक मोठेंच भाग्य होय. कांहींजण आपल्या बायकोजवळही न सांगणारे गुपित मित्राजवळ सांगतात, आणि परमेश्वरावरही विश्वास न ठेवणारे लोक आपल्या मित्रावर ठेवतात.

सारे मित्र सारखे नसतात. कांहीं स्वार्थी, मतलबी असतात, तर कांहीं प्रामाणिक व परोपकारी असतात. कांहीं मित्र आयुष्यांत शेवटपर्यंत टिकून असतात, तर कांहीं अर्ध्या वाटेवर तुटून फुटून निघून जातात, तर कांहीं मित्र कालांतरानें शत्रु बनतात !

या बऱ्यावाईट मित्रांचा पसारा सोडून दिला, तरी माणसाच्या आयुष्यांत आणखी कांहीं वेगळेच मित्र येऊन गेलेले असतात. या मित्रांची ओळख आपल्याला फारशी किंवा मुळींच नसते. हे क्षणाचे मित्र असतात; कारण क्षणापुरताच त्यांचा आपला संबंध असतो. दुसऱ्याच क्षणीं ते अगदीं विसरले जातात आणि पुढें आयुष्यांत त्यांची आठवणही आपल्याला राहत नाहीं !

असे क्षणाचे मित्र आपल्याला आगगाडीच्या प्रवासांत नेहमीं भेटतात. चार गांवचे चार अनोळखी उतारू आगगाडीच्या डब्यांत जिवाभावाचे मित्र बनतात, तास दोन तास खेळीमेळीनें गप्पा मारतात, परस्परांचीं सुखदु:खें निवेदन करतात, आणि आपापलें स्टेशन येतांच, रामराम ठोकून बेपत्ता होतात ! प्रवासांत भेटलेले हे क्षणाचे मित्र पुढें आपल्याला कधींही नजरेला दिसत नाहींत, कीं त्यांची आपल्याला आठवणही राहत नाहीं !

हॉटेलांत आणि विश्रांतिगृहांतही असे क्षणाचे मित्र आपल्याला बरेच आढळून येतात. तुम्ही चहा पीत असतांना तुमच्या टेबलापाशींच बसलेला दुसरा इसम गांवांतल्या हवापाण्याविषयीं किंवा दंग्याधोप्या-

विषयीं गोष्ट काढतो. तुम्हीहि मग त्या चर्चेंत भाग घेतां. एखादे वेळीं तो तुमच्याकडे काड्याची पेटी मागतो आणि तुम्हीही त्याच्या हातांतले वर्तमानपत्र जरा ओढून घेतां. मग तुम्ही घाईघाईनें हॉटेलांतून बाहेर पडतांना 'मिस्टर, तुमची छत्री राहिली कीं!' म्हणून तो तुम्हाला महत्त्वाची आठवण करून देतो! वा! केवढा चांगला मित्र! पण क्षणाचा मित्र! पुढें तुमची आणि त्याची भेट होईल, ही आशा नाहीं! आणि भेट झालीच, तर ओळख राहील याचाही नेम नाहीं! सर्व कांहीं क्षणाचा संबंध, क्षणाचा जिव्हाळा!

तुमची हजामत करणारा न्हावी हा सुद्धां असाच एक क्षणाचा मित्र असतो. तुमची गुळगुळीत दाढी बनवितांना किंवा डोक्यावरील केसाचें छप्पर छाटतांना, तो तुमच्याशीं किती सलगीनें दिलखुलास वार्तालाप करतो! किती गंमतीच्या गोष्टी सांगून तुमची करमणूक करतो! पण ही मैत्री केवढी क्षणभंगुर! न्हावी निघून जातांच तुम्ही गाल चोळीत बसतां, आणि एक फार प्रेमळ मित्र क्षणाचा लळा लावून निघून गेला, अशी हुरहूर तुमच्या हृदयाला लागून राहते!

शर्यतीच्या मैदानावरही अचूक घोडे सांगणारे कांहीं परोपकारी मित्र तुम्हाला भेटतात. त्यांचे घोडे येवोत, किंवा न येवोत, पण गर्दींत लाभलेले हे क्षणाचे मित्र गर्दीमध्येंच नाहींसे होतात ! तुम्हाला पैसे मिळाले म्हणून तुमचें अभिनंदन करायला किंवा पैसे गेले म्हणून तुमचें सांत्वन करायला ते राहतच नाहींत ! कारण ते क्षणाचे मित्र असतात.

अनोळखी शहरांत तुम्ही वाट चुकून पडलांत, तर रस्त्यावरचा एखादा माणूस तुम्हाला सरळ रस्ता दाखवतो. तुम्ही त्याचे आभार मानतां, पण परत तो उपकारकर्ता तुम्हाला दिसायचा नाहीं !

जगांत क्षणाचे मित्र हे असे असतात ! आपल्यावर त्यांचे खूप उपकार असतात. पण आपल्याला त्यांची आठवण कांहीं राहत नाहीं !

## गर्दी

## २०

माणूस हा कळप करून राहणारा प्राणी आहे. म्हणजे गर्दी करून राहणारा प्राणी आहे. मुंबई-सारख्या शहरांत आज ही गर्दी फारच वाढलेली दिसून येते. रस्त्यांत किती गर्दी, गल्लींत किती गर्दी आणि खोलींत किती गर्दी, याला कांहीं सुमार राहिला नाहीं. गर्दींत जीव गुदमरून जात असला, तरी माणूस आनंदानें राहतो, याचें कारण गर्दी ही माणसाची प्रकृति आहे. खेड्यापाड्यांत पांगलेलीं माणसें शहरांत येऊन गर्दी करतात, याचें कारण एकांत अशा निर्जन ठिकाणीं त्यांना चैन पडत नाहीं. म्हणूनच गर्दींत आणखी भर घालण्यासाठीं दूरदूरचीं माणसें मोठ्या हौसेनें धांवून येतात.

माणसाला गर्दीचें आकर्षण वाटण्याचें कारण आणखीही एक आहे. गर्दींत घुसल्याशिवाय माणसाचा चरितार्थ चालत नाहीं. नोकरी, चाकरी, उद्योगधंदा, वैभव, कीर्ति, सर्व कांहीं गर्दीच्या ठिकाणींच माणसाला प्राप्त होत असते. म्हणून तो गर्दीकडे साहजिकच खेंचला जातो. चार पैसे कमविणें आणि चार पैसे उडविणें, हें गर्दीमध्येंच माणसाला शक्य असतें.

एखाद्या शहरांत गर्दी प्रमाणाबाहेर वाढली, म्हणजे कांहींजणांची कुचंबणा होते ही गोष्ट खरी. जागेची दुर्मिळता, अन्नधान्याची टंचाई, वाढती महागाई, इत्यादि आपत्तींना तोंड द्यावें लागतें. वाढत्या गर्दीला वस्तूंचा पुरवठा अपुरा पडतो आणि बाजारांत भाव कडाडतात. वाढत्या गर्दीला ट्राम, बस, आगगाड्या इत्यादि वाहनें अपुरीं पडतात आणि सामाजिक जीवन मोठें त्रासदायक बनतें. गर्दीमुळें दुकानांपुढें रांगा लागतात, थिएटरापुढें रांगा लागतात. शेंकडों प्रेक्षक तिकिटाच्या अभावीं निराशेनें परत जातात आणि उद्गार काढतात, ‘ छे बुवा ! गर्दी फारच आहे ! ’

गर्दीबद्दलच्या या तक्रारी रास्त असल्या, तरी गर्दीचे फायदेही कांहीं थोडेथोडके नाहींत. व्यक्तीच्या विकासाला, समाजजीवनाच्या उत्कर्षाला, धंद्याच्या

प्रगतीला आणि कलेच्या उन्नतीला गर्दीची अत्यंत जरूरी आहे.

सभेला गर्दी नसेल तर त्या सभेची काय शोभा! वक्ता हताश होतो! त्याच्या पुढारीपणाबद्दल आणि लोकप्रियतेबद्दल संशय निर्माण होतो! त्याचप्रमाणें नाटकाला किंवा सिनेमाला गर्दी नसेल तर 'हाउस फुल्ल' अशी पाटी लावण्याची सोय नाहीं! एखाद्या दुकानांत किंवा डॉक्टरच्या दवाखान्यांत जर गर्दी नसेल, तर तें लक्षण चांगलें नाहीं असे लोक समजतात. एखाद्या चळवळीला गर्दीचा पाठिंबा नसेल तर ती चळवळ फोल होय! म्हणून गर्दी ही व्यक्तीच्या विकासाला, समाजाच्या विकासाला आणि उद्योगधंद्याच्या भरभराटीला आवश्यक असते.

गर्दीमध्यें खिसेकापूंना आपलें कौशल्य प्रगट करण्यास संधि मिळते. गर्दीमुळें घरमालकांना पागडीचें प्रस्थ माजविण्यास संधि मिळते. गर्दीमुळें काळ्याबाजाराला भरपूर वाव मिळतो. गर्दीमुळें वाटेल तो रद्दी बोलपट चिकार गर्दीत चालतो! अशा रीतीनें गर्दी ही अनेकांच्या बाबतींत उपकारकच असते. सौंदर्याचें, कलेचें चीज गर्दीमध्येंच होत असतें.

मुंबई सरकारनें आपल्या अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्यासाठीं करमणुकीवर आणि चैनीच्या वस्तूंवर करवाढ केली आहे. करमणूक म्हणजे नाटक-सिनेमा आणि चैन म्हणजे श्रीमंतांचे चोचले अशी सर्वसाधारण समजूत आहे आणि सरकारचीही तीच समजूत आहे. म्हणून चैनीवर कर ठेवण्याचा सरकारचा हेतु हा कीं, श्रीमंतांनाच त्याची झळ लागावी आणि गरिबांच्या दैनंदिन जीवनाला कांहीं उपसर्ग पोंचूं नये.

पण चैन म्हणजे काय ? कोणत्या वस्तूला चैनीची वस्तु म्हणावी ? चैनबाजीची व्याख्या सोइस्करपणें वाटेल तशी करतां येईल. स्त्रीनें तोंडाला लावायची

पावडर आणि म्हाताऱ्यानें केंसाला लावायचा कलप ह्या कांहीं जीवनोपयोगी वस्तु नाहींत. ती चैनच आहे. रोज रोज हजामत आणि दाढी करणें ही सुद्धां चैनच आहे. कारण अन्नवस्त्राप्रमाणें हजामत ही जीवनाची गरज नाहीं. उघडया मैदानावर किंवा समुद्रकिनाऱ्यावर हवा खाणें ही सुद्धां चैनच आहे. कारण श्वास घेण्यास पुरेल इतकीच हवा माणसाला जिवंत राहण्यास पुरत असतांना, जादा हवा खाणें म्हणजे चैनच आहे.

मोटरींत बसणें ही जशी चैन, तसेंच खुर्चीवर बसणें ही सुद्धां चैनच आहे. खुर्चीवर बसणें, टेबलावर लिहिणें, आणि पलंगावर झोंपणें हे चैनीचेच प्रकार नाहींत तर काय ? कारण या सगळया गोष्टी जमिनीवर आडवे–उताणें पडून आपण करूं शकतों.

चैनीच्या प्रमाणेंच करमणुकीच्या बाबतींतही अनेक गोष्टींचा समावेश होऊं शकतो. नाटक सिनेमा पाहणें ही जशी करमणूक, तशीच रस्त्यांत मित्रांबरोबर गप्पा मारीत हंसणें, खिदळणें ही सुद्धां करमणूकच ! कथा, कादंबऱ्या, मासिकें, वृत्तपत्रें यांचें वाचन म्हणजेही करमणूकच ! दिवाळी अंकाला तर आपण करमणुकीची मेजवानी म्हणतों. हिंदुस्थानांत बहुसंख्य लोक

निरक्षर आहेत, ही गोष्ट लक्षांत घेतां, अशा प्रकारचें हें वाङ्मय बहुजनसमाजाच्या दैनंदिन गरजांमध्यें मोडत नाहीं. अर्थात् फार थोड्या लोकांच्या करमणुकी-साठीं चाललेली ही चैनच आहे !

थिएटरांतल्या सिनेमाप्रणेंच घरांतल्या घरांत पत्ते खेळणें हीही करमणूकच. वाजाच्या पेटीवर भसाडया आवाजांत गाणें म्हणणें आणि तें ऐकणें, राणीच्या बागेंतील चित्रविचित्र जनावरें पाहणें आणि तेथील माकडांबरोबर थट्टामस्करी करणें, कुरूप स्त्रीला घेऊन चांदण्या रात्रीं सहल करणें, हे सर्व प्रकार करमणु-कीच्या आणि चैनीच्या सदरांत जमा होतात. म्हणून अशा प्रकारांवर करवाढ करण्यास हरकत नाहीं.

आणि आपल्या धार्मिक सणांत आणि उत्सवांत किती जबरदस्त करमणूक भरलेली आहे ! दिवाळींतील फटाकडे आणि रोषणाई, शिमग्यांतील धुळवड आणि सोंगें, गणपति उत्सवांतील मेळे आणि नकला, मंगळा-गौरीच्या फुगडया, हे सर्व करमणुकीचे विविध प्रकार नाहींत काय ?

पण करमणुकीच्या सदरांत घोडयाच्या शर्यतींना ढकलण्यांत सरकारनें चूक केली आहे असें वाटतें.

रेसकोर्सच्या प्रवेशतिकिटाच्या किंमतीवर करवाढ करण्यांत आली आहे. वास्तविक, रेसला जाणारा माणूस आपले सर्व पैसे गमावून दुःखीकष्टी होऊन बाहेर पडतो. याला काय करमणूक म्हणायची? आणि अशा दुर्दैवी माणसावर काय कर लादायचा?

पण घड्याळ आणि फाउन्टन पेन या दोन वस्तूंवर चैनीचा शिक्का मारून त्याच्यावर विक्रीकर वाढविण्यांत सरकारनें फारच शहाणपणा केला आहे यांत शंका नाहीं. खरोखर हिंदुस्थानांत घड्याळ ही एक निरुपयोगी आणि केवळ चैनीची वस्तु आहे. भिंतीवर आणि मनगटावर केवळ शोभेची वस्तु म्हणून याची मांडणी करण्यांत येते. वक्तशीरपणा आणि हिंदी लोक यांचा काडीमात्र संबंध नसतां, आज इतक्या घड्याळांची जरूरी काय? आज हिंदुस्थानांत हजारों घड्याळें आहेत, पण वेळेवर अध्यक्ष कधीं सभेला हजर राहत नाहीं, वेळेवर नाटक सुरू होत नाहीं, वेळेवर प्रवासी आगगाडी गांठूं शकत नाहीं, आणि रोगी मरत असतां वेळेवर डॉक्टर येऊं शकत नाहीं! अशा परिस्थितींत घड्याळ म्हणजे केवळ शोभेची आणि चैनीचीच वस्तु समजावयास नको काय?

घड्याळापेक्षां फाउन्टन पेन ही अधिक निरर्थक आणि चैनीची बाब आहे. या निरक्षर देशांत जिथें बोरूचा आणि लेखणीचा लोक उपयोग करूं शकत नाहींत, तिथें फाउन्टन पेनला काय महत्त्व ! लोकांनीं केवळ शोभेखातर तें कोटाच्या खिशांत लटकवावें आणि चोरांनीं गर्दीत तें लांबवावें, एवढाच फाउन्टन पेनचा उपयोग !

देशमुख आणि कंपनी

१२१ शनवार, पुणें २.

किंमत तीन रुपये

●

पुढील प्रकाशनें

१ मोहनिद्रा

दत्तु बांदेकर

२ नवी स्त्री

वि. स. खांडेकर